१०३ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

• पुणे, शुक्रवार २९ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३४१, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 341, Marathi - Daily - Pune, 29 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## लालबागच्या राजाला डॉलरचा हार दान



**मुंबई** - मुंबईतील प्रसिद्ध गणपती लालबाग राजाच्या दर्शनासाठी गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी प्रचंड गर्दी केली. देश-विदेशातून आलेल्या भक्तांनी नवसापोटी मोठ्या प्रमाणावर दान अर्पण केले. पहिल्याच दिवशी लाखो रुपयांची रोकड जमा झाली असून दानपेटीत सोने-चांदी व परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळाले आहे. विशेष म्हणजे भाविकांकडून आलेला अमेरिकन डॉलर्सचा हार सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्मचारी दानपेट्यांतील नोटांची मोजणी करत असून त्यात १०, ५०, १०० आणि ५०० रुपयांच्या नोटांसह परदेशी नोटाही आढळल्या. लालबाग राजाला भाविकांकडून मिळालेल्या दानामध्ये दोन लाख रुपये किमतीचा सोन्याचा मोदक, सोन्याची पावले, हार, मुकुट, अंगठ्या, नाणी, सोन्याचे गणपती तसेच एक किलो वजनाची चांदीची वीट, चांदीचे मोदक, गणपती, मुकुट, हार, पाळणे, समया आणि फुलघरे यांचा समावेश आहे.



गण सिद्धी विनायक सोसायटीच्या गणेशोत्सव मंडळाचा सुवर्णमहोत्सव यंदा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. सलग ५० वर्षे अखंडितपणे गणेशोत्सवाची परंपरा जोपासणाऱ्या मंडळाने धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन, सांस्कृतिक स्पर्धा व समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले आहे. यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला.

## उद्धव-राज २० वर्षांनी सहकुटुंब भेट
## मात्र फडणवीसही पोहोचल्याने चर्चेला ऊत

**मराठीच्या मुद्यावरून एकत्र आलेल्या ठाकरे बंधुंचे कुटुंब गणरायाच्या दर्शनाच्या निमित्ताने तब्बल २० वर्षांनी काल एकत्र आले. मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी माजी मुख्यमंत्री, शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काल सहकुटुंब गणपतीचे दर्शन घेण्यासाठी गेले. ठाकरे बंधू एकत्र आले, पण कुटुंब एकत्र येणार का, अशी कुजबुज सुरू असायची. या कौटुंबिक गाठीभेटीने या सगळ्यांना उत्तर दिले. त्यांच्या या भेटीचीच काल चर्चा होती . मात्र उद्धव ठाकरे गेल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज ठाकरे यांच्या शिवतीर्थवर पोहोचले. दोघा बंधुंच्या कौटुंबिक भेटीमुळे आनंदलेली मराठी माणसे फडणवीस भेटीच्या वृत्ताने मात्र हिरमुसली.**



■ मुंबई

**उद्धव** ठाकरे सकाळी शिवतीर्थवर पोहोचले. रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे सोबत होते. यापूर्वीही दोन्ही कुटुंबे वेगवेगळ्या कौटुंबिक कार्यक्रमाच्या निमित्ताने ठिकठिकाणी भेटली. पण अनेक वर्षानंतर पहिल्यांदाच राज ठाकरे यांच्या घरी कौटुंबिक स्नेहमिलन झाले.

५ जुलैला मराठीच्या मुद्यावरून पहिल्यांदा एकत्र आले. २७ जुलैला उद्धव ठाकरे यांना जन्मदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे हे मातोश्रीवर गेले होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या मृत्यूनंतर राज ठाकरे पहिल्यांदाच मातोश्रीवर गेले. ही दुसरी भेट झाली. काल २७ ऑगस्टला तिसरी भेट झाली. महिनाभरात दोघे बंधू तीनवेळा एकत्र आले. याआधी फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दरवर्षी राज यांच्या घरी गणेश दर्शनाला जात असत. यावर्षीही फडणवीस दर्शनाला गेले. शिंदेंनीही आज दर्शन घेतले. राज ठाकरेंच्या घरी गणेश दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, » पान ७ वर

## जरांगेंचे आज मुंबईत आंदोलन ओबीसी समाज विरोध करणार

**ओबीसीतून टिकणारे मराठा आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील हे बेमुदत आंदोलन करण्यावर ठाम आहेत. ते आज उशिरा मुंबईत पोहोचून उद्या आझाद मैदानावर आंदोलन सुरू करणार आहेत. त्याचवेळी त्यांच्या आंदोलनाची ताकद कमी करण्यासाठी शनिवारपासून ओबीसी समाजही साखळी उपोषण सुरू करणार आहे. यामुळे दोन समाजात तेढ निर्माण करून त्यांना आपसात लढविण्याचे सरकारचे षड्यंत्र आहे असा आरोप होत आहे.**

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने जरांगे-पाटील यांच्या आझाद मैदानावरील आंदोलनास मनाई केल्यानंतर मराठा समाजाचा रोष संतापत पोलिसांनी अनेक कठोर अटी लावत सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत आंदोलनाची परवानगी दिली. त्याचबरोबर आंदोलक हिंसाचार करणार नाहीत, अधिक माणसे आली तर त्यांना टप्प्याने बोलावले जाईल अशा हमीपत्रावर जरांगे यांची सही घेण्यात आली. मात्र बेमुदत उपोषणाच्या मागणीवर ठाम असलेल्या आंदोलकांना मैदानातून पाचनंतर बाहेर कसे काढणार, विरोध झाल्यास काय करणार, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. परंतु हे आंदोलन फार दिवस सुरू राहणार नाही, अशी चर्चा आहे. याचे कारण आज फडणवीस आंदोलनाबाबत बोलताना म्हणाले की, एका समाजाचे आरक्षण काढून दुसऱ्याला देता येणार नाही. शासन दोन्ही समाजाच्या हिताचा विचार करून दोन्ही समाजाला न्याय देईल. फडणवीस यांच्या या वक्तव्यावरून स्पष्ट होते की, आंदोलन सुरू झाले आहे आणि त्याला काय उत्तर देऊन आरक्षणाचे श्रेय घ्यायचे हे सरकारने आधीच ठरवले आहे.

जरांगेंच्या आंदोलनाच्या बंदोबस्तासाठी फडणवीस यांच्या गृह खात्याने आझाद मैदानात शेकडो » पान ५ वर

## अमेरिकेच्या वाढीव टॅरीफमुळे भारतातील लाखो नोकऱ्या धोक्यात

■ नवी दिल्ली

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या पन्नास टक्के वाढीव आयात शुल्कामुळे (टॅरीफ) भारतातील महत्त्वाची उद्योग क्षेत्रे उद्ध्वस्त होण्याची भीती निर्माण झाली असून या क्षेत्रांमधील लाखो लोकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळण्याचा धोका आहे,असे पत्र द चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने (सीटीआय) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिले आहे.

वाढीव आयात शुल्कामुळे देशातील वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, रत्न आणि दागदागिने,वाहनांचे सुटे भाग निर्मिती,रसायन निर्मिती,



औषधनिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स आणि मत्स्योद्योग आणि अन्य उद्योगक्षेत्रांवर अत्यंत दूरगामी परिणाम होतील,असे सीटीआयचे अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे.

आयात शुल्क वाढीमुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय मालाच्या किमती अन्य पुरवठादार देशांमधून येणाऱ्या मालाच्या तुलनेने सुमारे ३५ टक्के महाग होणार आहेत. त्यामुळे अमेरिकन ग्राहक भारतीय मालाऐवजी अन्य देशांच्या मालाकडे आकर्षित होईल.तसे झाल्यास भारताचे सुमारे ४८ अब्ज डॉलरच्या निर्यातीला फटका बसेल.देशाची » पान ७ वर

## बिहारमध्ये वाद सुरू असतानाच प.बंगालमध्ये याद्या तपासणी

■ नवी दिल्ली

**बिहारमध्ये** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्रिक्षणावरून (एसआयआर) देशात गदारोळ सुरू असताना आयोगाने आता पश्चिम बंगालमध्ये अशाच प्रकारे मतदार याद्यांची फेरतपासणी करण्याची तयारी चालवली आहे.

बिहारमधील एसआयआरवरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील सर्वपक्षीय नेते निवडणूक आयोगावर आणि पर्यायाने केंद्र सरकारवर सातत्याने टीका करत आहेत. यामध्ये प.बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आघाडीवर आहेत. ममता बॅनर्जी बिहार एसआयआरसह शालेय अभ्यासक्रमात त्रिभाषा सुत्राचा आग्रह या मुद्यावरून केंद्र सरकारला वारंवार आव्हान देत आहेत. बोगस मतदारांचा मुद्दा ममता बॅनर्जी यांनी लावून धरला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने प.बंगालच्या » पान ७ वर

## नाशिक कुंभमेळा प्राधिकरणात साधू महंतांचा समावेश करावा

**भारतीय संत समितीची मागणी**

■ नाशिक

**नाशिक** त्र्यंबकेश्वर कुंभमेळासाठी राज्य सरकारने प्राधिकरणाची स्थापना केली. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली २२ सदस्यांचा समावेश प्राधिकरणात करण्यात आला आहे. मात्र साधू महंतांना प्राधिकरणात स्थान दिले नसल्याने नाराजी आहे. यात १३ आखाड्यांचे प्रत्येकी दोन महंतांचा समावेश करावा, अशी मागणी आज संत संमेलनात साधू महंतांनी केली.

नाशिकमध्ये झालेल्या संत संमेलनात आज अखिल भारतीय संत समितीचे अध्यक्ष जितेंद्रनंद सरस्वती महाराज यांनी हा मुद्दा उपस्थित केला. अनेक आखाड्यांचे साधू-महंत उपस्थित



होते. कुंभमेळा हा साधू-संतांचा आणि आखाड्यांचा प्रमुख धार्मिक सोहळा आहे. अशा पवित्र पर्वात साधू-महंतांना डावलून फक्त प्रशासकीय अधिकाऱ्यांवर आधारित प्राधिकरण रचना करणे योग्य नाही. प्रत्येक आखाड्यातील किमान दोन महंतांना प्राधिकरणात स्थान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. संत संमेलनात साधू-महंतांनी स्पष्टपणे इशारा दिला की, कुंभमेळ्याचे नियोजन हे केवळ प्रशासकीय प्रक्रियापुरते मर्यादित नसून धार्मिक परंपरेशी जोडलेले आहे. साधू-महंतांना प्राधिकरणाबाहेर ठेवणे हा अन्याय आहे. शासनाने तातडीने १३ आखाड्यांपैकी प्रत्येकी २ प्रतिनिधींचा समावेश करावा. प्राधिकरणाचे कामकाज सुरू असतानाच साधू-महंतांनी व्यक्त केलेल्या नाराजीमुळे शासनासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे.

## चॅट जीपीटी वापरून मुलाने आत्महत्या केली

**पालकांची कोर्टात धाव**

■ कॅलिफोर्निया

**कृत्रिम** बुध्दिमत्तेवर (एआय) आधारित चॅट जीपीटीचा सध्या वैज्ञानिकांनी धसका घेतला आहे. एआयचे समाज जीवनावर विपरीत परिणाम होत आहेत. अशातच चॅट जीपीटीने एका मुलाला चक्क आत्महत्या करण्यास मदत केल्याची धक्कादायक घटना अमेरिकेतून समोर आली असून मुलाच्या पालकांनी न्यायालयात तसा दावा दाखल केला आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्नियामधील ही घटना आहे.

गेल्या एप्रिल महिन्यात सोळा वर्षे वयाच्या ॲडम रायन या मुलाने चॅट जीपीटीवर बरेच दिवस चॅटींग करून आत्महत्या केली.पोलिसांना ॲडमच्या मृतदेहाजवळ एक चिठ्ठी मिळाली. चिठ्ठीत ॲडमने आपल्या आत्महत्येचे कारण लिहिले होते. पुढील तपासात ही चिठ्ठी ॲडमने चॅट जीपीटीच्या मदतीने लिहिली होती, असे आढळून आले.

ॲडमच्या पालकांनी चॅट जीपीटीची निर्माती कंपनी ओपन एआय आणि कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम अल्टमन यांच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

## आसाराम बापूचा अंतरिम जामीन मुदतवाढीस हायकोर्टाचा नकार

**३० ऑगस्टपर्यंत पुन्हा कारागृहात रवानगी**

■ जयपूर

**जोधपूरमध्ये** लैंगिक अत्याचार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला राजस्थान उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. न्यायालयाने त्याचा अंतरिम जामीन कालावधी वाढवण्यास नकार दिला आहे. अहमदाबादच्या सिव्हिल हॉस्पिटलच्या वैद्यकीय अहवालाच्या आधारे हा निर्णय देण्यात आला. त्यामुळे आता आसारामला ३० ऑगस्टपर्यंत जोधपूर मध्यवर्ती कारागृहात आत्मसमर्पण करावे लागणार आहे.

वैद्यकीय अहवालानुसार, सध्या आसारामची प्रकृती तुरुंगात राहण्यासाठी योग्य आहे. हा आदेश राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिनेश मेहता आणि न्यायमूर्ती विनीत कुमार माथुर यांच्या पीठाने दिला.



न्यायालयाने म्हटले, की भविष्यात त्याच्या प्रकृतीत गंभीर बिघाड झाला, तर तो पुन्हा जामिनासाठी अर्ज करू शकेल. मात्र सध्या तो स्वस्थ आहे आणि त्याला तुरुंगात परत जाऊन शिक्षा भोगणे आवश्यक आहे.

याआधी, १२ ऑगस्ट रोजीही आसारामने जामिनासाठी अर्ज केला होता. त्यावेळी न्यायालयाने वैद्यकीय अहवालाच्या आधारे २९ ऑगस्टपर्यंत जामिनाची मुदत वाढवली होती, मात्र यावेळी कोर्टाने थेट आत्मसमर्पणाचा आदेश दिला आहे. भविष्यात आसारामला कोणतीही गंभीर आरोग्य समस्या उद्भवली, तर नवीन वैद्यकीय अहवालाच्या आधारावर तो पुन्हा जामिनासाठी अर्ज करू शकतो. सध्याचा आदेश स्पष्ट संकेत देतो की, तो आता तुरुंगाबाहेर राहू शकणार नाही आणि ठरलेल्या वेळेत आत्मसमर्पण करणे अनिवार्य आहे.

## विरारमध्ये इमारत कोसळली १७ जणांचा मृत्यू! ९ जखमी

■ विरार

**विरारच्या** नारंगी येथील रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा काही भाग कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात तब्बल १७ जणांचा मृत्यू झाला असून, ९ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एक वर्षाची उत्कर्षा आणि तिची आई आरोही जोवील (२४) यांचाही समावेश आहे. मंगळवारी रात्री उशिरा झालेल्या या अपघातस्थळाला आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार राजन नाईक व आमदार स्नेहा दुबेही उपस्थित होते. मृतांच्या वारसांना राज्य सरकारने ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

रमाबाई अपार्टमेंटमध्ये एकूण ५० सदनिका होत्या. त्यापैकी अंदाजे १२ सदनिका या अपघातात कोसळल्या व शेजारील चाळ उद्ध्वस्त झाली. अनेक कुटुंबे मलब्याखाली दबली. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाने युद्ध पातळीवर बचावकार्य सुरू केले. जेसीबी यंत्रे आत शिरू शकत नसल्याने अडथळे आले. मात्र शेजारची चाळ पाडल्यामुळे मदतकार्याला वेग आला. बचावकार्यातून आतापर्यंत २६ जणांना बाहेर काढण्यात आले, त्यापैकी १७ जणांचा » पान ७ वर

## १२ वर्षीय मुलीची बलात्कार करून हत्या दोन गुन्हेगार सुप्रीम कोर्टात निर्दोष सुटले

■ नवी दिल्ली

**एका** १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या केल्याप्रकरणी उच्च न्यायालयाने दोषी ठरवून फाशी आणि जन्मठेपेची शिक्षा ठोठावलेले दोन आरोपी सर्वोच्च न्यायालयात सबळ पुराव्याअभावी निर्दोष सुटले.

उत्तर प्रदेशच्या लखनौमध्ये सप्टेंबर २०१२ मध्ये घडलेली ही घटना आहे. ही मुलगी रात्री आपल्या घराच्या मागच्या बाजूस शौचासाठी गेली असता आरोपी पुताई आणि दिलीप यांनी तिच्यावर बलात्कार करून तिची गळा दाबून हत्या केल्याचा आरोप आहे .



कनिष्ठ न्यायालयाने २०१४ मध्ये दोन्ही आरोपींना दोषी ठरवून पुताई याला फाशी तर दिलीप याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.या शिक्षेला आरोपींनी अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले असता न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. आरोपींनी सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केले. सर्वोच्च न्यायालयात न्या. विक्रम नाथ, न्या. संजय करोल आणि न्या. संदीप मेहता यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने सबळ पुराव्याअभावी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्याचवेळी पोलिसांच्या ढिसाळ तपासावर न्याायालयाने कठोर ताशेरे ओढले. केवळ परिस्थितीजन्य पुराव्यावर आधारित खटल्यांचा तपास करताना पोलिसांनी » पान ७ वर

## वैष्णोदेवी भूस्खलनात ३४ मृत्यू मृतांच्या कुटुंबियांना ९ लाख देणार

■ श्रीनगर

**वैष्णोदेवी** यात्रा मार्गावर मंगळवार २६ ऑगस्ट दुपारी भूस्खलन झाल्याने भीषण अपघात झाला. यातील मृतांचा आकडा ३४ झाला असून, जखमींची संख्या २३ झाली आहे. मृतांमध्ये १६ महिला आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे. दरड कोसळल्यानंतर लष्कर, सीआरपीएफ, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ यांच्या मदतीने बचाव व शोधमोहीम राबवण्यात आली.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ३४ पैकी २५ मृतदेह जम्मू गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये नेले आहेत. २० मृतांची ओळख पटली आहे. ते देशात विविध राज्यांतील भाविक होते. या घटनेनंतर वैष्णोदेवी यात्रा स्थगित करून दरड हटवण्याचे काम सुरू आहे. यामध्ये आणखी कोणी अडकलेले नसावे, यासाठी प्रशासन सतर्क आहे. जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल आणि श्री माता वैष्णोदेवी बोर्डाचे अध्यक्ष मनोज सिन्हा यांनी मृतांच्या कुटुंबियांसाठी प्रत्येकी ९ लाख रुपयांची मदत जाहीर केली. त्यामध्ये ५ » पान ७ वर

## अफगाणिस्तानात बस अपघात २५ जणांचा मृत्यू! २७ जखमी

**वाहनचालकाचा निष्काळजीपणा**

■ काबूल

**अफगाणिस्तानची** राजधानी काबूलजवळील अर्घंडी परिसरात प्रवासी बसचा अपघात झाला. या अपघातात २५ जणांचा मृत्यू झाला असून, २७ जण गंभीर जखमी झाले. ही बस दक्षिण अफगाणिस्तानातील हेलमंद आणि कंधार प्रांतातून प्रवाशांना घेऊन काबूलकडे येत होती. वाटेत अर्घंडी भागात बस उलटली.

अफगाणिस्तानच्या गृह मंत्रालयाचे प्रवक्ते अब्दुल मतीन कानी यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात अपघाताचे



मुख्य कारण वाहनचालकाचा निष्काळजीपणा असल्याचे समोर आले आहे. गेल्या आठवड्यात इराणहून परत येणाऱ्या अफगाणी शरणार्थींना घेऊन जाणाऱ्या बसच्या अपघातात ७९ जण मृत्युमुखी पडले होते. मृतांमध्ये १७ बालकांचाही समावेश होता. अफगाणिस्तानमध्ये सतत चाललेल्या युद्धामुळे रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. त्यातच महामार्गांवरील धोकादायक व बेफिकीर वाहनचालक, वाहतूक नियमांचे उल्लंघन, तांत्रिकदृष्ट्या जुनी आणि असुरक्षित बस यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.


ऋतुजा आणि स्पंदन हिंदळेकर यांच्या घरचा गणपती


सुनील नवले परिवाराचा राजा अभ्युदयनगर, काळाचौकी मुं. नं. ३३.


रमाकांत गोविंद मांगेला, नारिंगी, विरार यांच्या घरचा गणपती.


मंगेश गेनू मानकर यांचा घरगुती गणपती, कुर्ला वेस्ट.


बाल सेवा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, काळाचौकी.


वसंत नवले, टिळक नगर, चेंबूर, यांच्या घरचा बाप्पा.


कोकणातील साहित्यिक बाबू घाडीगांवकर यांच्या घरातील गणराय.


कोरगांवकरांचा बाप्पा, मुंबई (वर्ष १०३ वे).


सौरभ स्मिता संजय नार्वेकर यांच्या घरचा विघ्नहर्ता (ताडदेव).


प्रतिक्षा राऊत विरार (पूर्व) यांच्या घरातील शाडूची सुबक मूर्ती.


रामेशभाई ठक्कर यांच्या घरचा श्रीगणेश


गणेश लोकरे यांच्या कल्याण येथील घरातील गणपती बाप्पा


रमेश पांडुरंग सावंत (भोसले), फोंडाघाट, टेंबवाडी यांचा बाप्पा


कोकणातील पारंपरिक गणेशोत्सव, महाडिक परिवाराच्या गणरायचे आगमन, मु. बोरीचामाळ, पोस्ट तळेगाव, ता. तळा जि. रायगड.

# पाच दुर्मीळ खनिज खाणींचा लिलाव रद्द

■ बंगळुरू

**बोलीदारांच्या** थंड प्रतिसादामुळे कर्नाटक, गुजरात आणि छत्तीसगढमधील पाच दुर्मीळ खनिज खाणींचा पाचव्या टप्प्यातील लिलाव रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. गुजरात आणि छत्तीसगढमधील ग्लाउकोनाईट या खनिजाच्या तीन खाणींच्या लिलावामध्ये एकाही बोलीदाराने प्रतिसाद दिला नाही. तर कर्नाटकमधील निकेल आणि पीजीई या दोन खाणींसाठीची लिलाव प्रक्रियादेखील अत्यल्प प्रतिसादामुळे रद्द करण्यात आल्याचे खाण मंत्रालयाने जाहीर केले. खाण मंत्रालयाने एकूण पंधरा दुर्मीळ खनिज खाणींसाठी लिलाव प्रक्रिया सुरू केली होती. त्यापैकी दहा खाणींचा लिलाव यशस्वीरित्या पार पडला. ग्राफिईट, फॉस्फेट, आरई, वॅनाडियम, पोटॅश आणि हॅलाईट या खनिजांच्या या खाणी आहेत. छत्तीसगढ, कर्नाटक, ओदिशा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये या खाणी आहेत.

# शाळेच्या बाथरूममध्ये विद्यार्थिनीचे आत्मदहन

■ पाटणा

**पाटणामधील** गरदानीबाग परिसरातील आमला टोला कन्या शाळेच्या बाथरूममध्ये इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने आत्मदहन केले. पीडित विद्यार्थिनी दमडिया येथील रहिवासी असून तिच्या शरीराचा वरचा भाग जळाला आहे. या घटनेनंतर शाळेबाहेर मोठी गर्दी जमली. स्थानिक पोलिसांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त विद्यार्थी आणि कुटुंबियांनी शाळेची तोडफोड केली. पोलिसांनाही मारहाण केली. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता त्यांना रॉकेलचा एक कॅन सापडला. बाथरूम सील करण्यात आले असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

देश विदेश

# व्हिएतनाम आणि थायलंडमध्ये पुरामुळे हाहाकार! ८ बळी

■ हनोई

**आशिया** खंडाच्या आग्नेय भागांत काजिकी वादळानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे व्हिएतनाम आणि थायलंडमध्ये हाहाकार माजला आहे.व्हिएतनामच्या उत्तर आणि मध्य प्रांतामध्ये पूरस्थिती आणि पावसामुळे झालेल्या पडझडीत आतापर्यंत ८ जणांचा बळी गेला आहे. व्हिएतनामच्या ईशान्य भागात बुधवारच्या रात्रीत ८ इंच एवढा पाऊस झाला.या पावसामुळे घडलेल्या पडझडी ७ लोकांचा बळी गेला असून एक जण पुराच्या पाण्यात वाहून बेपत्ता झाला आहे. तर ३४ जण जखमी झाले आहेत. या भागात आजही पूरस्थिती कायम आहे. थायलंडच्या हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार पूर आणि दरडी कोसळल्याच्या घटनांमुळे शेकडो घरे जमीनदोस्त झाली. चियांग माई शहरात पडझडीच्या घटनांमध्ये एका व्यक्तिचा बळी गेला तर एक व्यक्ती बेपत्ता आहे. येत्या ४८ तासांत मुसळधार पावसाचा कहर सुरूच राहणार असून टेकड्यांच्या पायथ्याशी आणि नदीकिनारी राहणाऱ्या लोकांना धोक्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अमेरिकेत शाळेत गोळीबार २ विद्यार्थ्यांचा मृत्यू! १७ जखमी

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** मिनेसोटा राज्यात मिनिया पोलीस कॅथलिक स्कूलमध्ये एका माथेफिरू तरुणाने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. तर १७ विद्यार्थी जखमी झाले. हे सर्व विद्यार्थी आठ ते दहा वयोगटातील आहेत. हल्लेखोराने गोळीबारानंतर स्वतःवरही गोळी मारून घेत आत्महत्या केली. मिनेसोटाचे गव्हर्नर टीम वॉल्ट्झ यांनी ही माहिती दिली.ही घटना भयंकर असल्याचे वॉल्ट्झ म्हणाले.

हल्लेखोराचे नाव रॉबीन वेस्टमन (२०) असल्याचे पोलीस तपासात समजले. या तरुणाची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी ज्ञात नाही,असे मिनेसोटा पोलिसांनी सांगितले. स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार सकाळी शाळेत प्रार्थना सुरू असताना हा गोळीबार झाला. या घटनेचे वृत्त कळताच पोलीस आणि रुग्णवाहिकांचा शाळेभोवती वेढा पडला होता. रुग्णवाहिकांमधून जखमी विद्यार्थ्यांना तातडीने नजीकच्या रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले.

# कॅलिफोर्नियातून भारताच्या चार उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण

■ नवी दिल्ली



**कॅलिफोर्नियातील** 'वॅंडेनबर्ग स्पेस फोर्स' तळावरून 'स्पेसएक्स'च्या फाल्कन -९ रॉकेटवरून 'पिक्सेल स्पेस' आणि 'ध्रुव स्पेस' या दोन स्टार्ट-अप्सनी आपले एकूण चार उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित केले.'पिक्सेल'ने यावर्षी जानेवारीमध्ये तीन फायरफ्लाय उपग्रह प्रक्षेपित केले होते. पिक्सेलच्या उपग्रह प्रक्षेपणामुळे स्टार्ट-अपच्या सहा हायपरस्पेक्ट्रल उपग्रह संरचनेच्या पहिल्या टप्प्याची पूर्तता झाली असून त्यामुळे पृथ्वीला जवळून आणि स्पष्टपणे पाहणे शक्य होणार आहे.

बंगळुरुमधील 'पिक्सेल'च्या तीन फायरफ्लाय उपग्रहांचे यशस्वीरित्या प्रक्षेपण झाले आहे,असे बंगळूरुचे पिक्सेल स्पेसचे संस्थापक आणि सीईओ अवैस अहमद यांनी 'एक्स'वर म्हटले आहे. तसेच हैदराबाद येथील ध्रुव स्पेसद्वारे ऑस्ट्रेलियाच्या अकुला टेक आणि एस्पर सॅटेलाइट्सकडून अभिभार (पेलोड) घेऊन जाणारा आपला पहिला व्यावसायिक 'लीप-०१' उपग्रहही प्रक्षेपित केला आहे.

# फ्रान्सने मादागास्करच्या राजाची कवटी परत केली

■ पॅरिस

**फ्रान्सने** वसाहतकालीन तीन कवट्या मादागास्कर या पूर्व आफ्रिकेतील देशाला परत केल्या. यापैकी एक कवटी मालागासी राजा टोएरा यांची असल्याचे सांगण्यात येते. तर उर्वरित दोन कवट्या सकलावा वांशिक गटाच्या आहेत. १८९७ साली फ्रेंच सैनिकांनी या राजाचा शिरच्छेद केला होता. यानंतर हे शीर फ्रान्सने विजयचिन्ह म्हणून पॅरिसला नेले आणि तेथील राष्ट्रीय इतिहास संग्रहालयात ठेवले होते. २०२३ मध्ये फ्रान्सने एक कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार मानवी अवशेष मृतांच्या मूळ देशात परत करण्याची परवानगी मिळाली.

# सप्टेंबरपासून मुंबईत इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी

■ मुंबई

**देशातील** पहिली पर्यावरणपूरक आणि आधुनिक सुविधांनी युक्त अशी इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी सेवा येत्या २२ सप्टेंबरपासून मुंबईत सुरू होणार आहे. गेटवे ऑफ इंडिया ते जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी अर्थात जेएनपीएपर्यंत ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी नियमित चालणार आहे.

या नव्या सागरी वाहतूक सुविधेमुळे मुंबईतील प्रवासाला एक नवीन आणि पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होणार आहे. सध्या या मार्गावर साध्या बोटी जात असून प्रवासाला साधारण एक तासाहून अधिक वेळ लागतो आणि भाडे प्रति प्रवासी १०० रुपये आहे. नवीन इलेक्ट्रिक बोटींमुळे प्रवासाचा वेळ ४० मिनिटे होणार आहे. भारत फ्रेट ग्रुपचे मालक सोहेल कझानी यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात दोन बोटी सुरू केल्या जातील.यापैकी एक हायब्रिड बोट असून ती सौरऊर्जा, इलेक्ट्रिक बॅटरी आणि डिझेल बॅकअपवर चालेल, तर दुसरी पूर्णपणे इलेक्ट्रिक असेल. दोन्ही बोटी एका तासाच्या आत चार्ज करता येऊ शकतील.पुढील टप्प्यात जनरेटर बसवल्यानंतर चार हायड्रोजनवर चालणाऱ्या बोटी सेवेत दाखल होतील. माझगाव डॉक शिपबिल्डर्स आणि बीएफजी यांच्या भागीदारीत बांधलेल्या या वॉटर टॅक्सीमध्ये आलिशान सोफा-सीट (२०), वातानुकूलन,अत्याधुनिक नेव्हिगेशन सिस्टम आणि लक्झरी प्रवासासाठी खास डिझाइन केलेले इंटीरियर आहे. १० नॉटिकल मैल प्रतितास या वेगाने धावणाऱ्या या बोटींमध्ये २x२५ किलोवॉट मोटर आणि ६० किलोवॉट पॉवरपॅक आहेत.

# आता विद्यार्थ्यांचे आधार कार्ड शाळेतून अपडेट करता येणार

■ नवी दिल्ली

**आता** शाळांमध्येच विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बायोमेट्रिक अपडेट केले जाणार आहे. यूआयडीएआय म्हणजे युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाने यासाठी सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांना विशेष शिबिरे आयोजित करण्याचे आदेश दिले आहेत. या मोहिमेअंतर्गत ५ ते १५ वयोगटातील मुलांचे आधार बायोमेट्रिक अपडेट केले जातील. या उपक्रमामुळे देशभरातील तब्बल १७ कोटी प्रलंबित आधार अपडेट पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. शाळांमध्ये कॅम्प पद्धतीनेच विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक अपडेट वेगाने पूर्ण करता येईल. शाळांना थेट माहिती उपलब्ध करून दिली जाईल.यासाठी यूआयडीएआयने शालेय शिक्षण विभागाला सोबत घेतले असून, यूडायस+ॲप्लिकेशनवर शाळांना नेमके कोणत्या विद्यार्थ्यांचे आधार अपडेट प्रलंबित आहे हे दिसणार आहे. त्यामुळे शाळांना सर्व विद्यार्थ्यांचे अपडेट एका ठिकाणी पूर्ण करण्यास सोपे जाईल,असे यूआयडीएआयचे सीईओ भुवनेश कुमार यांनी मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. यामुळे कोणकोणत्या विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रिक अपडेट करणे बाकी आहे,याची माहिती शाळांना बघता येईल.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गजलक्ष्मी साप्ताहिक सोडत
सोडत दर सोमवार ते रविवार
जिंकले जिंकले
जुलै महिन्यात बक्षीसांचा वर्षाव
पहिले बक्षिस ₹ 10000
तिकीट ₹ 20/-

महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु
सोडत दि.03/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-02-5529
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा

महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम
सोडत दि.14/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-5726
रिटेलर: कार्तिक लॉटरी सेंटर, दादर
स्टॉकिस्ट: श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर

महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र
सोडत दि.18/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-5379
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: पवार लॉटरी, ठाणे

महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु
सोडत दि.24/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-8988
रिटेलर: जय संतोषी माँ लॉटरी सेंटर, मुलुंड
स्टॉकिस्ट: सुमित एजन्सी, मुंबई

महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल
सोडत दि.29/07/2025 विजेता तिकीट क्र: GL-03-4585
रिटेलर आणि स्टॉकिस्ट: हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा
विजेते आणि विक्रेते यांचे हार्दिक अभिनंदन!

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥





# ज्यादा सुविधांसाठी ज्यादा भार

भारतातील रेल्वे नेटवर्क हे सर्वसामान्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरलेली परिवहन व्यवस्था आहे. जवळपास एक लाख किलोमीटरचे रेल्वे मार्ग भारतात आहेत. म्हणजे जवळपास देशातील प्रत्येक जिल्ह्यात छोटी मोठी रेल्वे लाईन गेल्याचे पाहायला मिळते. भारताची सर्वाधिक लोकसंख्या आणि सर्वाधिक लोकसंख्येचा विचार करून सर्वाधिक उपयुक्त ठरलेली रेल्वे व्यवस्था अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे. गेल्या काही वर्षापासून देशाच्या अनेक भागात बरेच नवे रेल्वे मार्ग टाकले जात आहेत. तेजस. वंदेभारतसारख्या आधुनिक सुविधा असलेल्या रेल्वे गाड्या सुरू होत आहेत. सर्वसामान्य माणसाला परवडणाऱ्या पॅसेंजर किंवा एक्सप्रेस गाड्यांमध्येदेखील अधिकाधिक सुधारणा करण्याचा प्रयत्न होतो आहे. परंतु हे करीत असताना रेल्वे नकळतपणे प्रवाशांच्या खिशातून पैसेही वसुल करीत आहे. सध्या रेल्वेचे धोरण हे ज्यादा सुविधा ज्यादा भाडे अशा पद्धतीचे झालेले आहे. अर्थात लोकांनादेखील अशा सुविधांची आवश्यकता आहे. दोन पैसे जास्त गेले तरी चालतील परंतु प्रवास सुखरूप झाला पाहिजे अशी लोकांची इच्छा असते. एकेकाळी तर विनाआरक्षण रेल्वे गाड्यांमधून सहजपणे प्रवास करता येत होता. परंतु आता त्याच्या उलट परिस्थिती झाली आहे. आरक्षण असेल तरच प्रवास खात्रीचा आणि सुखरूप होऊ शकतो. देशाच्या अनेक भागात सामान्य माणसाला ही स्वस्तातली आणि वेगवान रेल्वे सेवा खूप सोयीची पडते. परंतु आता बदलत्या काळाप्रमाणे आणि सुरक्षित प्रवासासाठी रेल्वेने महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे तो म्हणजे आता विमानांप्रमाणे रेल्वेतूनही प्रत्येक प्रवाशाला पन्नास किलो वजनाचे लगेजच घेऊन जाता येणार आहे. एवढेच नव्हे तर प्रवासांच्या बँगांचे आकारही निश्चित करण्याचा रेल्वेचा विचार आहे. पन्नास किलो वजनाची ही मर्यादा म्हणजे ज्यादा सुविधा ज्यादा भाडे याच पठडीतली म्हणावी लागते. विमानामध्ये साधारणपणे वीस ते चाळीस किलो वजन एका प्रवाशाला नेता येते. त्यापेक्षा ज्यादा झालेले सामान आता विमानतळावरच टाकून देण्याची वेळ येते.

### रोजगार करणाऱ्यांना फटका

आतापर्यंत रेल्वेतून जाताना प्रवाशांबाबतीत असा काही नियम नव्हता. फक्त जे सामान प्रवासी डब्यात नेता येत नाही अशा सामानासाठी वेगळे लगेज म्हणून ज्यादा दर आकारला जात होता. परंतु आत अगदी विमानांप्रमाणेच ज्यादा सामान घेऊन जाण्यावर बंधन घालण्याचा रेल्वेचा विचार सामान्य माणसासाठी त्रासदायक ठरू शकतो. विशेषतः हातावर रोजगार असणाऱ्या किंवा ज्यांना वारंवार नोकरी व्यवसायाच्यानिमित्ताने सतत वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागते. अशांना रेल्वेच्या या निर्णयाचा फटका बसू शकतो. आज भारतामध्ये पंचवीस ते तीस टक्के वर्ग असा आहे की ज्याला फिरते राहूनच आपला पोटापाण्याचा व्यवसाय करावा लागतो. याचे एक उदाहरण म्हणजे भारतात ठिकठिकाणी वर्षभर कुठे ना कुठे यात्रा भरत असतात. या यात्रांमध्ये व्यवसाय करणाऱ्यांचा आणि त्यातून आपला चरितार्थ चालवणाऱ्या लोकांची मोठी संख्या आहे. यातल्या बऱ्याच जणांना आपल्याबरोबरचा हा सामान रेल्वेने घेऊन जाणे शक्य होते. काही महानगरांमध्ये तर आजुबाजूच्या खेड्यापाड्यांमधून रोज दोनशे तीनशे किलोचे सामान घेऊन लोक विक्री खरेदीसाठी येत असतात. त्यांना आता या पन्नास किलो वजनाच्या मर्यादेमुळे आर्थिक फटका तर बसेलच शिवाय व्यवसायाच्यादृष्टीनेसुद्धा त्याचा त्रास होऊ शकतो. याशिवाय असे तीस ते चाळीस टक्के प्रवासी असतात की जे भरपूर सामान आपल्याबरोबर नेतात. आणि त्यांच्या सामानाने अगदी आरक्षित डब्यातील जागादेखील मोठ्या प्रमाणावर व्यापली जाते. अनेकांचे तर आरक्षित बर्थच्या पलिकडे इतर ठिकाणी सामान ठेवले जाते. म्हणजेच आपल्या सामानाने डब्यातली जागा अडवणाऱ्यांची संख्यादेखील मोठी आहे. रेल्वेने लांबचा प्रवास करता येत असल्याने अशा प्रकारे अधिकाधिक सामान बरोबर नेण्याची आवश्यकता भासत असते. परंतु आता प्रवासाचे स्वरूप बदलते आहे. रेल्वे गाड्यांची संख्या वाढूनही गाड्यांना प्रचंड गर्दी असते. लोकांनी तुडुंब भरणाऱ्या या गाड्यांमध्ये सामानाला किती जागा द्यायची याचा विचार करण्याची आवश्यकता रेल्वेला भासलेली दिसते.

### सामान्यांवर अधिभार

मुंबईसारख्या महानगराचा जरी विचार केला तरी उपनगरी गाड्यांमधून असं भरमसाठ सामान नेता येणे किती अवघड जाते याची सहजपणे कल्पना येऊ शकते. म्हणूनच व्यवसाय करणाऱ्यांसाठी उपनगरी गाड्यांना वेगळे लगजेचे कंपार्टमेंट असते. परंतु याच उपनगरी गाड्यांचा पन्नास किलोपेक्षा जास्त सामानाची ने आण करणाऱ्यांची संख्यादेखील बरीच मोठी आहे. मुंबईच्या सिटी बसेसमध्येसुद्धा वाटेल तसे सामान नेता येत नाही. कारण जागेची मर्यादा हा तर भाग असतोच. प्रवाशांची सुरक्षितता हादेखील तितकाच महत्त्वाचा मुद्दा ठरतो. विमान प्रवास आणि रेल्वे प्रवास याची खरेतर सामानाच्याबाबतीत तुलना करणे तितकेचे योग्य ठरत नाही. जिथे विमानाचा सगळाच प्रवास हा हवेतल्या वजनावर अवलंबून असतो. म्हणजेच प्रवासी क्षमतेबरोबरच त्यापेक्षा जास्त वजन विमानातून वाहुन नेणे धोकादायक ठरते. त्या तुलनेत रेल्वेचा कारभारही अवाढव्य असतो. डब्यांची आणि प्रवाशांची संख्या याचा सारासार विचार केला जातो. मात्र मिळालेल्या सोयीचा गैरफायदा घेण्याचेही प्रकार वाढू लागले आहेत. एकूणच सुरक्षिततेचा विचार केला तर या निर्णयाची अंमलबजावणी योग्य वाटू शकते. परंतु एकदम पन्नास किलोची मर्यादा घालणे प्रवाशांवर अन्याय करणारेसुद्धा ठरू शकते. बऱ्याचवेळेला दोन मोठ्या बॅगांचे वजनही पन्नास किलो होऊ शकते. प्रती प्रवासी ही मर्यादा थोडी कमी केली पाहिजे. विशेषतः मध्यमवर्गीय आणि रोजगार व्यवसाय करणाऱ्यांना त्याचा त्रास होणार नाही. पॅसेंजर गाड्यांमध्ये तर विनाआरक्षण असा सामान घेऊन जाणाऱ्यांचीच संख्या जास्त असते. म्हणूनच सामान्य माणसाच्या सामानावरचा हा भार जास्त ठरू शकतो.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

जीवनात यशस्वी होण्यासाठी दोन व्यक्तींचा खूप मोठा सहभाग असतो.एक निंदक आणि दुसरा स्पर्धक.कारण दोन्ही व्यक्ती माणसात 'जिद्द' निर्माण करत असतात.

## पंचांग

शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर

रवी उदय- ०६-२४
रवी अस्त- १८-५५



भाद्रपद शुक्ल षष्ठी
नक्षत्र : स्वाती

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० तूळ

सूर्यषष्ठी; कार्तिकेय दर्शन; श्री बलराम जयंती; राष्ट्रीय क्रीडा दिन

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.

Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## गव्हाची खीर

★ **साहित्य :-** १ कप गहू, खपली गहू असेल तर आणखी उत्तम, वेलची पूड अर्धा चमचा, बदाम आणि काजूचे तुकडे प्रत्येकी एकेक टेबलस्पून, १० ते १५ मनुका, १ कप गूळ, ३ ते ४ चमचे साजूक तूप.

★ **कृती :-** गहू निवडून स्वच्छ करून घ्या, धुवून घ्या आणि त्यानंतर रात्रभर पाण्यात भिजत घाला. यानंतर सकाळी ३ कप पाणी आणि रात्रभर भिजलेला गहू थेट कुकरमध्ये शिजण्यासाठी घाला. मध्यम आचेवर साधारण ८ ते १० शिट्ट्या होऊ द्या. गहू शिजायला थोडा जास्त वेळ लागतोच. नसेल शिजला तर आणखी थोडा वेळ शिजवा. आता शिजलेला गहू मिक्सरमध्ये भरडून घ्या किंवा मग रवीने फेटून घ्या. कढईमध्ये ४ टेबलस्पून तूप टाका. तूप तापल्यानंतर त्यामध्ये काजू- बदामाचे तुकडे टाकून परतून घ्या. त्यानंतर मनुका घाला.सुकामेवा परतून घेतल्यानंतर त्यात गव्हाची भरड टाका आणि ३ ते ४ मिनिटे परतून घ्या. गहू व्यवस्थित परतून झाला की त्यात पाणी घाला. गहू शिजवून उरलेलं जे पाणी आहे, ते पाणी या खिरीत टाका. गहू आणि पाणी एकजीव झालं की त्यात किसलेला गूळ घाला आणि ८ ते १० मिनिटे शिजवून घ्या. जसंजसं शिजत जातं, तसतसं खिरीतलं पाणी आटत जातं. त्यामुळे तुमच्या आवडीनुसार घट्ट, पातळ ठेवावे. खीर शिजत आली की त्यात वेलची पूड घाला. जेव्हा खीर सर्व्ह करणार असाल तेव्हा ऐनवेळी त्यात दूध घाला आणि मग सर्व्ह करा. गरम खीर असेल तर गरम दूध घाला. खीर थंड झाली असेल तर थंड दूध वापरा. थंड किंवा गरम अशा दोन्ही पद्धतीने ही खीर खाता येते.

# आजपासून बिहारमध्ये आशिया हॉकी स्पर्धा सुरू
## कझाकिस्तान आणि जपान पहिला सामना होणार

**बिहारच्या राजगीरमध्ये आशिया हॉकी कप २९ ऑगस्टपासून सुरू सुरुवात होणार आहे. या स्पर्धेतील शेवटचा कझाकिस्तानचा पुरुष हॉकी संघ राजगीरमध्ये दाखल झाला. हा संघ १९९४ नंतर या खंडीय शोपीसमध्ये पहिलाच सहभाग आहे. येर्केबुलन ड्युसेबेकोव्ह यांच्या नेतृत्वाखालील संघ काल रात्री उशिरा उतरला. भारतीय भूमीवर त्यांचा पहिलाच सहभाग होणार आहे.**





■ राजगीर

कझाकिस्तानचा १९९४ चा हिरोशिमा येथे झालेला आशिया कप पाचव्या स्थानावर संपला होता. त्याच वर्षी त्यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेतही सहावे स्थान मिळविले होते. सध्या एफआयएच जागतिक क्रमवारीत ८१ व्या क्रमांकावर असलेले कझाकस्तान गट अ मध्ये यजमान भारत, जपान आणि चीनसह आहे. ते २९ ऑगस्ट रोजी जपानविरुद्ध आपली मोहीम सुरू करतील. त्यानंतर ३१ ऑगस्ट रोजी चीनशी लढतील आणि त्यानंतर गट फेरीचा शेवट १ सप्टेंबर रोजी भारताविरुद्ध होईल. कझाकिस्तानचा कर्णधार येर्केबुलन ड्युसेबेकोव्ह यांनी कबूल केले की, त्यांच्या संघाला कठोर संघर्ष करावा लागेल. भारत, जपान आणि चीनसह गटात स्थान मिळवणे हे एक कठीण आव्हान असेल. परंतु आशियातील काही सर्वोत्तम संघांविरुद्ध स्वतःची चाचणी घेण्याची ही एक उत्तम संधी म्हणून आम्ही पाहतो. आमचे ध्येय कठोर संघर्ष करणे, शिस्तीने खेळणे आणि या मोठ्या मंचावर कझाकिस्तानला अभिमान वाटेल अशी कामगिरी करणे हे आहे.

भारतीय हॉकी संघासह, चीन, जपान, चिनी ताइपे, मलेशिया, कोरिया, कजाखिस्तान आणि बांगलादेश हे संघ मैदानात उतरतील. गत विजेत्या दक्षिण कोरिया संघाने या स्पर्धेत (१९९४, १९९९, २००९, २०१३ आणि २०२२) सर्वाधिक पाच वेळा जेतेपद मिळवले. त्यापाठोपाठ भारतीय हॉकी संघासह (२००३,२००७ आणि २०१७) आणि पाकिस्तान हॉकी संघ (१९९२, १९८५ आणि १९८९) प्रत्येकी ३-३ वेळा ही स्पर्धा जिंकून संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानावर आहे.

# जोकोविच यूएस ओपनच्या तिसऱ्या फेरीत
## अमेरिकेच्या झाचेरी वाज्दाचा पराभव

■ न्यूयॉर्क



यूएस ओपनमध्ये सलग दुसऱ्या सामन्यात नोवाक जोकोविच थकलेला दिसत होता आणि एक सेट गमावला होता, परंतु २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता नोवाक जोकोविचने वेळेवर पुनरागमन करत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. फ्लशिंग मीडोज येथे पहिल्या आणि दुसऱ्या फेरीत विजय मिळवण्याचा जोकोविचचा विक्रम ३६-० असा झाला. त्याने १४५ व्या क्रमांकाच्या क्वालिफायर अमेरिकेच्या झाचेरी वाज्दाचा ६-७, ६-३, ६-३, ६-१ असा पराभव केला. ११ जुलै रोजी विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत यानिक सिनरकडून पराभव पत्करल्यानंतर जोकोविच त्याची पहिलीच स्पर्धा खेळत आहे. आता त्याचा तिसरा सामना ब्रिटनच्या कॅम नुरीशी होईल, ज्याला त्याने सहा वेळा हरवले आहे. नूरीने अर्जेंटिनाच्या फ्रान्सिस्को कोमेसाना याचा ७-६ (५), ६-३, ६-७ (०), ७-६ (४) असा पराभव केला.

# उत्तर झोनच्या ६ बाद ३०८ धावा

■ बंगळुरू

बंगळुरूच्या बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स ग्राउंडमध्ये पूर्व झोनविरुद्ध आजपासून सुरू झालेल्या दुलीप ट्रॉफीच्या कसोटी उपांत्यपूर्व फेरीच्या पहिल्या दिवसाअखेर उत्तर झोनने ६ बाद ३०८ धावा केल्या. पूर्व विभागाने क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. शुभम खजुरिया आणि अंकित कुमार यांनी पहिल्या विकेटसाठी ४९ धावांची भागिदारी केली. अंकित कुमारने ३० धावा करून बाद झाला. त्यापाठोपाठ शुभम खजुरिया ३० धावा करुन माघारी परतला. या दोन्ही फलंदाजांना मनीषीने पायचित केले. यश धुळ आणि आयुष बदोनी यांनी संघाची धावसंख्या २ बाद १३३ वर पोहोचली. त्यावेळी यश धुळ ३९ धावांवर खेळताना त्याला मनीषीने पायचित केले. संघाची धावासंख्या ३ बाद १९४ धावांवर पोहोचताच आयुष बदोनी ६३ धावांवर बाद झाला. निशांत सिंधू आणि कन्हैया वाधवान यांनी संघाचा डाव सांभाळला.मात्र निशांत सिंधू ४७ धावा करुन माघारी परतला. साहिल लोत्रा फक्त १९ धावा करुन बाद झाला. कन्हैया वाधवान ४२ धावा आणि मयंक डागर २८ धावा करुन नाबाद तंबूत परतला.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिकेआधी मिचेल सँटेनरसह ३ खेळाडू जखमी

■ ऑकलंड

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय मालिका गमावल्यानंतर आता ऑस्ट्रेलियन संघ पुढील महिन्यात न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. ऑस्ट्रेलियन संघ न्यूझीलंडविरुद्ध १ ऑक्टोबरपासून ३ सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. मात्र त्याआधी यजमान न्यूझीलंडच्या अडचणीत वाढ झाली आहे. मिचेल सँटेनरसह तीन खेळाडू जखमी झाले. यामुळे हे चौघे ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेत खेळणार का, याबाबत सांशकता व्यक्त केली जात आहे.

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज विलियम ओरुकेला पाठदुखीमुळे ३ महिने क्रिकेटपासून दूर रहावे लागले आहे. विलियमआधी ग्लेन फिलिप्स, फिन एलन आणि मिचेल सँटनर या तिघांनाही दुखापतीने ग्रासले आहे. सँटनर ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या टी-२० मालिकेत नेतृत्व करणार आहे. मात्र सँटनरला ग्रोईन इंजरीचा त्रास आहे. या मालिकेआधी तो फिट होईल, असा आशावाद न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने व्यक्त केला आहे. दुसरीकडे ग्लेन फिलिप्सलाही गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्रस्त आहे तर फिन एलनच्या पायाला दुखापत झाली आहे. त्यामुळे हे दोघेही या मालिकेत खेळतील की नाही याबाबत शंका आहे. एकाचवेळी विलियम ओरुके, ग्लेन फिलिप्स आणि फिन एलन हे तिघे नसणे न्यूझीलंडसाठी अडचणीचे ठरु शकते. ऑस्ट्रेलियन संघ न्यूझीलंड दौऱ्यात फक्त टी-२० मालिका खेळणार आहे.



# सेंट्रल झोनच्या २ बाद ४३२ धावा
## मालेवारची द्विशतकाकडे वाटचाल

■ बंगळुरू



डॅनिश मालेवार यांच्या १९८ धावांच्या नाबाद खेळीमुळे सेंट्रल झोनच्या संघाने दुलीप ट्रॉफीच्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी २ बाद ४३२ धावा केल्या. ईशान्य झोनने क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. आयुष पांडे आणि आर्यन जुयाल हे सेंट्रल झोनसाठी सलामीसाठी उतरले. मात्र संघाची धावसंख्या ४ वर असताना आयुष पांडे झेलबाद झाला. डॅनिश मालेवारने आर्यन जुयालसोबत संघाचा मोर्चा सांभाळला. आर्यन जुयाल हा शतक करेल, असा वाटत असताना तो ६० धावांवर रिटायर्ड हर्ट झाला. कर्णधार रजत पाटीदार आणि डॅनिश मालेवार यांची जोडी चांगलीच जमली. त्यांनी संघाची धावासंख्या २ बाद ३४७वर नेली. त्यावेळी रजत पाटीदार १२५ धावा करुन माघारी परतला.

# बॅडमिंटनपटू एचएस प्रणॉय
## वर्ल्ड चॅम्पियनशिपमधून बाहेर

■ लंडन



भारतीय बॅडमिंटनपटू एचएस प्रणॉय मोठा अपसेट घडवण्याच्या जवळ पोहोचला होता. पण जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनकडून पराभव पत्करल्याने तो बीडब्ल्यूएफ वर्ल्ड चॅम्पियनशिपमधून बाहेर पडला. दोन वर्षांपूर्वी वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकणारा प्रणॉय दीड तास चाललेल्या सामन्यात ८-२१, २१-१७, २१-२३ असा पराभूत झाला. या पराभवानंतर तो म्हणाला, मी शेवटी काही वाईट शॉट्स खेळले. मला थोडे अधिक ऊर्जा ठेवायला हवी होती. शेवटी मी त्याला संधी दिल्या. मॅच पॉइंट गमावणे नेहमीच दुखावते, एका सामन्यामुळे स्पर्धेची दिशा बदलू शकते. फॉर्ममध्ये असलेल्या खेळाडूला हरवल्याने आत्मविश्वास वाढतो, परंतु पराभवानंतर उलट घडते. मला अशा परिस्थितीत राहायचे नव्हते.

# श्रीकांत चषक जिंकण्यासाठी ६४ खेळाडूंमध्ये शनिवारी चुरस

■ डेहराडून

श्रीकांत स्पोर्ट्स क्लब व सार्वजनिक गणेशोत्सव-कांदिवलीतर्फे लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत श्रीकांत चषक विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धा जिंकण्यासाठी ६४ खेळाडूंमध्ये ३० ऑगस्ट रोजी चुरस होईल. आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने होणाऱ्या स्पर्धेत मुंबई शहर व उपनगरसह ठाणे पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खेळाडू सहभागी होत असल्यामुळे सामने दर्जेदार होतील. गत कॅरम हंगाम गाजविणारा प्रसन्ना गोळे विरुद्ध अर्णव गावंड यामध्ये उद्घाटनीय सामना माजी केंद्रीय राज्यअर्थमंत्री आनंदराव अडसूळ यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. शालेय कॅरम खेळाडूंची प्रमुख स्पर्धेत उत्तम कामगिरी होण्यासाठी पालकांच्या विशेष मागणीनुसार स्पर्धात्मक खेळासह मोफत मार्गदर्शन देखील दिले जाणार आहे. चॅम्पियन कॅरम बोर्डवर ही स्पर्धा बाद पध्दतीने होईल. महात्मा गांधी विद्यामंदिरची राष्ट्रीय सबज्युनियर कॅरमपटू तनया दळवी, कळसुलकर इंग्लिश स्कूल -सावंतवाडीचा भारत सावंत, इंग्लिश स्कूल-जैतापूरचा आर्यन राऊत, पोद्दार अकॅडमी-मालाडचे प्रसन्न व पुष्कर गोळे, आयईएस सुळे गुरुजी शाळेची ग्रीष्मा धामणकर, पार्ले टिळक विद्यालयाचा अमेय जंगम, श्री नारायण गुरु हायस्कूल-चेंबूरचा उमेर पठाण, चेंबूर हायस्कूलचा मयुरेश पवार, डॉ. अँटोनियो दासिल्वा हायस्कूल-दादरचा ध्रुव भालेराव व ओमकार देसाई, शारदाश्रम विद्यामंदिर-दादरचा आरव अंजर्लेकर, ओमकार इंटरनॅशनलची प्रेक्षा जैन, कनोसिया हायस्कूलची वेदिका पोमेंडकर, मायकल हायस्कूलचा निखिल भोसले, जनरल एज्युकेशन अकॅडमीचे वेदांत लोखंडे, आयईएस पाटकर विद्यालय-डोंबिवलीचे नील म्हात्रे, सारा देवन व निधी सावंत आदी सबज्युनियर कॅरमपटूमध्ये निकराच्या लढती रंगतील. अशोकनगर, कांदिवली-पूर्व येथील श्रीकांत स्पोर्ट्स क्लबच्या सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये प्रतिवर्षी युवा खेळाडू व कलाकारांना प्रोत्साहन देतांना विविध समाजोपयोगी उपक्रमांपैकी मोफत शालेय कॅरम स्पर्धा गतवर्षापासून अधिक लोकप्रिय ठरत आहे.

# राहुल गांधींच्या यात्रेने बिहार काँग्रेसला उभारी



**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा बिहारमध्ये मतदार हक्क यात्रा काढण्याचा उद्देश यशस्वी होताना दिसत आहे. जागोजागी होणाऱ्या सभांमध्ये चांगली गर्दी जमत आहे. लोक त्यांना बघण्यासाठी आणि स्पर्श करण्यासाठी उत्सुक आहेत. पूर्णियातील प्रवासादरम्यान राहुल गांधींनी २ किलोमीटर बुलेट चालवली. कप्तान पुलापासून पंचमुखी मंदिरापर्यंतच्या बुलेट प्रवासात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम हेल्मेटशिवाय मागच्या सीटवर बसले होते. लाईन बाजारात गर्दीतील एक तरुणाने सुरक्षा कडे तोडत राहुल गांधींचे चुंबन घेतले, तेव्हा सर्वांनाच धक्का बसला.**

संजीव कुमार

पूर्णियामध्ये पारंपरिक आदिवासी नृत्याने त्यांचे स्वागत करण्यात आले. पंचमुखी मंदिर, होप हॉस्पिटल चौक, रामबाग, कसबा बाजार आणि झिरो माईल मार्गे यात्रा अररिया येथे पोहोचली. यावेळी जणूकाही संपूर्ण अररियाच राहुल गांधींच्या स्वागतासाठी रस्त्यावर उतरले आहे, असे वाटत होते. जणू काही हा जिल्हा पूर्णियाशी स्पर्धा करत आहे. एक दिवस आधी कटिहारमध्येही अशीच परिस्थिती होती. अधूनमधून पावसाची रिमझिम सुरू होती, पण लोकांचा उत्साह मात्र कमी झाला नाही.

बिहारच्या सीमावर्ती भागात मतदार हक्क यात्रेची मोठी क्रेझ दिसून आली. पूर्णिया महसूल विभागामध्ये ४ जिल्हे येतात. येथील अंदाज ४५ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. त्यांना वाटते की, ही यात्रा त्यांच्या मतदान हक्काचे रक्षण करण्यासाठी काढण्यात आली आहे. म्हणूनच लोक पावसात भिजत असतानाही राहुल गांधींची एक झलक पाहण्यासाठी तासनतास गर्दीमध्ये दाटीवाटीने उभे होते. राहुल गांधीही जनतेच्या भावना समजून घेत होते. म्हणूनच ते कटिहारमधील एका मखाना शेतात जाऊन शेतकऱ्यांशी हितगुज साधले. पूर्णियामध्ये बाईक रॅली काढली आणि अररियामधील एका ढाब्यावर चाय पे चर्चा केली.

राहुल गांधींच्या या दौऱ्याच्या मार्ग नियोजनाबद्दल बिहार काँग्रेसचे प्रवक्ते असित नाथ म्हणतात, की राहुल यांनी यापूर्वीही बिहारला भेट दिली आहे. यावेळी मार्ग निश्चित करताना दोन निकष ठेवण्यात आले होते. एक, मागील दौऱ्यात वगळण्यात आलेले जिल्हे समाविष्ट करावेत आणि दुसरा म्हणजे, जिथे पक्षाची एकेकाळी मजबूत



पकड होती, तिथे पुन्हा काँग्रेससाठी सुपिक जमीन तयार करणे.

राहुल गांधी यांची ही यात्रा राज्यातील ५० विधानसभा मतदारसंघांतून जात आहे. यापैकी २०२० च्या विधानसभा निवडणुकीत राजद-काँग्रेसप्रणित महाआघाडीने २३ जागा जिंकल्या. यात काँग्रेसने २० जागा लढवत ८ जिंकल्या. ही यात्रा सासाराम येथून सुरू झाली. कधीकाळी सासाराम हा काँग्रेसचा मजबूत बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. काँग्रेसचे मातब्बर नेते, माजी उपपंतप्रधान जगजीवन राम येथून सातत्याने निवडून येत होते. याबद्दल काँग्रेसचे बिहार प्रभारी कृष्णा अल्लावरू म्हणतात, 'सासाराम हे बिहारमधील एक महत्त्वाचे आणि ऐतिहासिक ठिकाण आहे. आम्हाला इतिहासात महत्त्व असलेल्या ठिकाणापासून प्रवास सुरू करायचा होता. सासाराम ही बाबू जगजीवन राम यांची कर्मभूमी आहे. या कारणांमुळे आम्ही सासारामची निवड केली.' सासारामनंतर ही यात्रा औरंगाबाद आणि गया येथे गेली. हाही काँग्रेसच्या विचारांचा भाग म्हणून ओळखला जायचा.

बिहारवर दीर्घकाळ सत्ता गाजवणारी काँग्रेस नंतर हळूहळू खूपच कमकुवत होत गेली. पक्षाच्या नेत्यांना बिहारमध्ये पुन्हा गतवैभव हवे आहे. म्हणून, काँग्रेसने प्रथम स्वतःच्या सोयीनुसार मार्ग निश्चित केला होता, परंतु नंतर पक्षाने मित्रपक्षांची काळजी घेत काही फेरबदल केले. राजदच्या सूचनेवरून सिकंदरा आणि जमुई यांचा समावेश करण्यात आला. महिनाभरापूर्वीच यात्रेचा मार्ग निश्चित करण्यात आला. सुरुवातीला छोट्या पातळीवर चर्चा सुरू झाल्या, नंतर हळूहळू सर्व मित्रपक्षांच्या नेत्यांनाही नियोजनामध्ये सामील करून घेण्यात आले.

# शिक्षकानेच विद्यार्थ्यांच्या जेवणात मिसळले फिनाईल

रायपूर



**छत्तीसगडच्या** सुकमा जिल्ह्यातील पाकेला पोर्टा केबिन निवासी विद्यालयात एका शिक्षकानेच तब्बल ४२६ विद्यार्थ्यांच्या जेवणात फिनाईल मिसळल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी शिक्षक धनंजय साहू याला अटक केली असून न्यायालयाने त्याला १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे.

आरोपी शिक्षक साहू आणि वसतिगृह अधीक्षक दुजल पटेल यांच्यात गेल्या वर्षभरापासून वाद सुरु होता. याआधी साहू अधीक्षक पदावर होता. मात्र, एका विद्यार्थ्याला मारहाण करून गंभीर दुखापत केल्यामुळे त्याची पदावरून हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर दुजल पटेल यांची अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली. या रागातूनच साहूने विद्यार्थ्यांच्या जेवणात फिनाईल मिसळल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

जिल्हाधिकारी देवेश कुमार ध्रुव यांनी आरोपी शिक्षकाला निलंबित केले. अधीक्षक दुजल पटेल यांनाही पदावरून हटवून समग्र शिक्षण विभागात हलवण्यात आले आहे. तसेच सहाय्यक अधीक्षक गौतम कुमार ध्रुव यांचीही बदली करून त्यांना माध्यमिक शाळेत पाठवण्यात आले.

# ऐन गणेशोत्सवात मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

मुंबई

**ऐन** गणेशोत्सवात आज दुपारी मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. टिटवाळा आणि आंबिवली स्थानकादरम्यान एका मालगाडीच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याने मुंबईकडे येणारी लोकल सेवा विस्कळीत झाली.या बिघाडामुळे कल्याणहून टिटवाळ्याकडे जाणाऱ्या गाड्या तब्बल एका तास उशिराने धावत होत्या. तर टिटवाळ्याहून कल्याणकडे येणारी रेल्वे सेवा काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती.

याचा थेट परिणाम कल्याण ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) या मार्गावरील लोकल वाहतुकीवर झाला. लोकल गाड्या १५ ते २० मिनिटे उशिराने धावत असल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले.

# सदाभाऊ खोत खाटकांचा एजंट हिंदुत्ववादी नेत्याचा घणाघात

पुणे

**रयत** क्रांती शेतकरी संघटनेचे नेते आणि भाजपाचे विधान परिषदेतील आमदार सदाभाऊ खोत यांच्यावर गोरक्षकांबाबतच्या वक्तव्यावरून पुण्यातील हिंदुत्ववादी कार्यकर्ते मिलिंद एकबोटे यांनी घणाघाती टीका केली आहे. खोत हे खाटकांचे एजंट आहेत. त्यांना राजकारणातून हद्दपार करा, असे एकबोटे म्हणाले.

महाराष्ट्रात तथाकथित गोरक्षकांच्या टोळ्या कार्यरत आहेत. कॉर्पोरेट ऑफिसमध्ये बसून ही मंडळी गोरक्षणाच्या नावाखाली शेतकऱ्यांना विनाकारण वेठीस धरतात. त्यांच्याविरोधात सरकारने कठोर कारवाई करावी अन्यथा राज्यातील सर्व पोलीस स्थानकांसमोर गोशाळा उभ्या करू, असा इशारा सदाभाऊ खोत यांनी दिला होता. त्यांच्या या वक्तव्यामुळे नाराज झालेल्या काही हिंदुत्ववाद्यांनी पुण्याच्या भेकराई नगर येथील द्वारकाधीश गोशाळेसमोर खोत यांना धक्काबुक्की केली.

# काश्मीरमध्ये २ दशतवाद्यांना कंठस्नान

श्रीनगर

**जम्मू-काश्मीरच्या** गुरेझ सेक्टरमध्ये भारतीय लष्कर आणि स्थानिक पोलिसांशी दहशतवाद्यांची चकमक झाली. या चकमकीत २ दहशतवाद्यांना कंठस्नान घातले असून नियंत्रण रेषेवर (एलओसी) घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे. याबाबत श्रीनगरस्थित चिनार कॉर्प्सने एक्स पोस्टच्या माध्यमातून माहिती दिली.

जम्मू काश्मीर पोलिसांना दहशतवाद्यांच्या घुसखोरीबाबत माहिती मिळाली होती. त्यानंतर भारतीय लष्कर आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. यावेळी जवानांना संशयास्पद हालचाली दिसल्या. त्यांनी घुसखोरांना आव्हान दिले. मात्र, दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार करण्यास सुरूवात केली. या गोळीबाराला प्रतिउत्तर देताना लष्कराने दोन दहशतवाद्यांना ठार केले.

# इनाम जमीन घोटाळ्यातून सुरेश धसांचे नाव वगळले

बीड

**आष्टी** तालुक्यातील सात देवस्थानांच्या इनाम जमिनी बेकायदेशीर खालसा करून हस्तांतरण केल्याच्या प्रकरणात भाजपा आमदार सुरेश धस व त्यांचे इतर सहकारी आरोपी होते. सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी या प्रकरणात घोटाळ्याचा आरोप करून कारवाईची मागणी केली होती. परंतु या प्रकरणातून आता सुरेश धस यांचे नाव वगळल्याची माहिती आहे. याप्रकरणी तपासादरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सातवेळा आरोपपत्र दाखल केले. मात्र पोलीस उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या अहवालात धस यांच्यासह त्यांची पत्नी प्राजक्ता धस, मनोज रत्नपारखी, देवीदास धस, अस्लम नवाब खान आणि इतर काही आरोपींना गुन्ह्यातून वगळण्यात आले आहे.

# केंद्र सरकार देशाचे की गुजरातचे? आमदार रोहित पवारांचा सवाल

मुंबई

**केंद्रातील** नरेंद्र मोदी सरकारकडून मुंबई आणि महाराष्ट्राचे महत्व पद्धतशीरपणे कमी केले जात आहे. केंद्र सरकार देशाचे आहे की फक्त गुजरातचे? असा सवाल आज राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या यजमानपदासाठी भारताच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. युवक व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या प्रस्तावानुसार, जागतिक दर्जाची क्रीडांगणे, अत्याधुनिक सुविधा आणि क्रीडाप्रेमी संस्कृतीमुळे अहमदाबाद हे या स्पर्धेसाठी आदर्श शहर असल्याचे नमूद करण्यात आले. यावरून रोहित पवार यांनी केंद्र सरकारवर टीका केली.

रोहित पवार म्हणाले की, केंद्र सरकारकडून अत्यंत पद्धतशीरपणे मुंबई आणि महाराष्ट्राचं महत्व कमी केले जात आहे. भारतीय वित्तीय प्रणाली कोड (आयएफएससी) सेंटरपासून तर हिरे व्यवसायापर्यंत अनेक उद्योग गुजरातमध्ये खेचून नेले गेले. आता त्याचाच एक भाग म्हणून २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धांसाठी मुंबईसारख्या नैसर्गिक निवडीला बगल देत अहमदाबादला प्राधान्य दिले जात आहे. आधी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि नंतर २०२६ ऑलिंपिकसाठीही गुजरातला प्रोजेक्ट करण्याचा डाव आहे.

# उरण तालुका बॅनरच्या विळख्यात सापडला

उरण

**उरण** तालुका सध्या बॅनरबाजीच्या विळख्यात सापडला आहे. नाक्यानाक्यावर परवानगीशिवाय लावले जाणारे बॅनर शहर आणि गावांचे विद्रुपीकरण करत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर असे बॅनर ठिकठिकाणी झळकत असून नगरपरिषद व ग्रामपंचायती याकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका होत आहे.

विशेष म्हणजे, जनजागृतीच्या उद्देशाने पोलिसांच्याही हातून चूक झाल्याचे टीका होत आहे. नशामुक्त उरण या उपक्रमांतर्गत उरण पोलीस ठाण्याने चारफाटा सर्कल येथे लावलेला बॅनर थेट मराठी पत्रकार संघाच्या दिशादर्शक फलकावर लावल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

# उरळी कांचनमध्ये उभारणार स्वतंत्र अग्नीशमन केंद्र! ११ कोटींचा निधी

पुणे

**जिल्ह्यातील** उरुळी कांचन, पूर्व हवेली, दौंड व पुरंदर परिसरातील वाढत्या आगीच्या घटना नियंत्रणात आणण्यासाठी उरुळी कांचन येथे पीएमआरडीएच्यावतीने स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. यासाठी तब्बल ११ कोटी ४ लाख २९ हजार ७६० रुपयांचा निधी वर्ग उपलब्ध केला असल्याची माहिती जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य व यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष कांचन यांनी दिली.

संतोष कांचन यांनी सांगितले की,हे केंद्र ग्रामपंचायत हद्दीतील कांचन सिटी येथे दोन एकर जागेत उभारण्यात येणार असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होणार आहे. पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे व अग्निशमन विभागप्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी काल उरुळी कांचन येथे यासंदर्भात पाहणी केली.मी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्याकडे अनेक वर्षे पाठपुरावा केला होता. अखेर आमच्या प्रयत्नांना यश आले.सध्या आग लागल्यास वाघोली किंवा हडपसर येथून अग्निशमन बंब बोलवावा लागत होता.त्यामुळे उशीर होऊन मोठे आर्थिक नुकसान होत असे. नवीन केंद्र उभारल्याने आगीसारख्या दुर्घटनांवर तातडीने उपाययोजना करता येणार आहे.

# जरांगेचे आज मुंबईत आंदोलन! ओबीसी समाज विरोध करणार

पान १ वरून

पोलिसांचा फौजफाटा तैनात केला आहे. सीआरपीएफच्या तुकड्याही तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या रिपाइंने मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

काल अंतरवाली सराटी येथून हजारो मराठा आंदोलक मुंबईकडे निघाले. आज त्यांनी जुन्नरला किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून दुपारी मुंबईच्या दिशेने रवाना झाले. हा मोर्चा चाकण, तळेगाव आणि लोणावळा मार्गे आज रात्री उशिरापर्यंत वाशीला व पुढे मुंबईला पोहोचेल . आज सकाळपासूनच आंदोलक आझाद मैदान परिसरात यायला सुरुवात झाली आहे. आंदोलक मोठ्या संख्येने रेल्वेनेही येत आहेत. जुन्नरहून निघताना जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना आझाद मैदानावरील आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देणे ही चेष्टा असल्याचा आरोप सरकारवर केला. ते म्हणाले, फडणवीसांनी अटी-शर्ती काढून टाकाव्यात. न्यायालयाने परवानगी नाकारल्यानंतरही ती आपण दिली. म्हणजेच आंदोलनाला परवानगी देण्याचा अधिकार आपल्याकडे आहे. फडणवीसांना मराठ्यांची मने जिंकण्याची संधी आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलनाला परवानगी द्यावी. आता गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही. आरक्षणाचा विजय घेऊनच मुंबईहून परतणार आहोत.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मी आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटलेला आहे. आता मराठा समाजाला ओबीसीत आरक्षण द्या म्हणतात. ओबीसीमध्ये अगोदरच ३५० जाती आहेत. मराठा समाजाला १० टक्के स्वतंत्र आरक्षण दिले आहे. राजकीय आरक्षण मिळणार नाही. सामाजिक किंवा नोकरीबाबतचं आरक्षण असेल तर विचार करता येईल. मराठा आरक्षण उपसमितीचे प्रमुख मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले की जरांगे पाटलांसोबत चर्चा करण्यासाठी सरकार तयार आहे. जरांगे मुंबईत दाखल झाल्यानंतर मंत्रिमंडळ उपसमिती त्यांच्यासोबत चर्चा करील.

दरम्यान गणेशोत्सवासाठी सातारा जिल्ह्यातील आपल्या दरे गावचा दौरा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऐनवेळी रद्द केला. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिंदेंनी हा दौरा रद्द केल्याची चर्चा आहे. फडणवीस समर्थकांकडून मुंबईत 'इतिहास हा कर्तृत्वाला लक्षात ठेवतो' असे लिहिलेले बॅनर लावण्यात आले आहेत. आंदोलनामुळे नवी मुंबईत मोठी वाहतूक कोंडी होऊ शकते. पोलिसांनी वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक मार्गात मोठा बदल केला आहे.

पोलिसांच्या अधिसूचनेनुसार लोणावळा, खोपोली येथून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून जरांगे पाटील यांच्यासोबत येणारी वाहने तसेच रायगड जिल्ह्यातील खालापूर शेडुंग मार्गे येणारी वाहने पनवेल शहर व कळंबोली परिसरातील महामार्गावर येऊ नयेत म्हणून आंदोलकांची वाहने येतील त्यावेळी द्रुतगती महामार्गावरून कोनफाट्याकडे तसेच बोर्ले टोलनाका ते पळस्पे फाटा महामार्गावर प्रवेश बंदी असणार आहे. यावेळी दुचाकी व हलक्या वाहनांना कळंबोली सर्कलमार्गे पनवेल शीव महामार्गावरील आणि खालापूर व खोपोली मार्गाचा वापर करता येईल. पोलिसांनी आंदोलकांना कळंबोलीच्या मॅकडोनाल्ड हॉटेलसमोरील पनवेल-शीव महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जाण्याचे आवाहन केले आहे.

आज जुन्नरमध्ये एका मराठा आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. सतिश देशमुख (वरपगाव, ता. केज) असे मृत आंदोलकाचे नाव आहे. जरांगे यांनी दुःख व्यक्त करत मृताच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

## आंदोलनासाठी पोलिसांच्या कठोर अटी

मुंबई पोलिसांनी आंदोलनासाठी आझाद मैदानावर आज सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंतची मुदत दिली आहे. यानंतर मोर्चेकऱ्यांना मैदानात थांबता येणार नाही. आंदोलनकर्त्यांच्या वाहनांना फ्रीवेने केवळ वडीबंदर जंक्शनपर्यंत येण्याची मुभा आहे. जरांगेसोबत असलेली केवळ पाच वाहने आझाद मैदानापर्यंत येऊ शकतात. मैदानावरील ७ हजार चौरस मीटर क्षेत्र हे आंदोलनासाठी राखीव असल्याने केवळ पाच हजार आंदोलकच येथे येऊ शकतील. अटीशर्तीचे उल्लंघन करत कायदेभंग केल्यास आंदोलन बेकायदेशीर ठरवून कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही मुंबई पोलिसांनी दिला आहे.

# मिलिंद नार्वेकरांच्या बाप्पाचे फडणवीसांनी दर्शन घेतले

मुंबई



**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने आज ठाकरेंच्या शिवसेनेचे विधानपरिषद आमदार मिलिंद नार्वेकर यांच्या घरी भेट दिली. गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर फडणवीस यांनी नार्वेकर कुटुंबीयांशी संवाद साधला. याशिवाय शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनीही नार्वेकरांच्या बाप्पाचे दर्शन घेतले. या दोन्ही नेत्यांसह नार्वेकर यांचे फोटो व्हायरल झाले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर या भेटीगाठी राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरल्या आहेत.

# शाहरुख खान-दीपिका पादुकोणसह हुंडई कंपनीच्या सहा जणांवर गुन्हा

जोधपुर

**बॉलीवूड** अभिनेता शाहरुख खान आणि अभिनेत्री दीपिका पादुकोण यांच्यासह हुंडई कंपनीच्या सहा जणांविरोधात राजस्थानमधील भरतपूर येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात भरतपूर येथील वकील कीर्ती सिंग यांनी सीजेएम न्यायालयात याचिका दाखल केली होती.

कीर्ती सिंग यांनी २०२२ मध्ये हरियाणामधून तब्बल २३ लाख ९७ हजार रुपयांना हुंडई कंपनीची कार खरेदी केली होती. गाडी खरेदी केल्यानंतर केवळ सहा-सात महिन्यांतच त्या वाहनात गंभीर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्याबद्दल वारंवार तक्रार केली असता कंपनीकडून मॉडेलमध्ये दोष असल्यामुळे काहीही करता येणार नाही, असे सांगण्यात आले.

याबाबत सिंग यांनी भरतपूर न्यायालयात याचिका दाखल केली. यामध्ये कंपनीने दोषपूर्ण वाहन विकून फसवणूक व विश्वासघात केला असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आणि ब्रँड ॲम्बेसिडर यांनी मिळून फौजदारी कट रचल्याचा दावा करण्यात आला.

फिर्यादीच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला, की जाहिरातींमधून ग्राहकांना चुकीची माहिती देण्यात आली. ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत हे कृत्य फसवणूक ठरते. सर्वोच्च न्यायालयाने २०२४ मध्ये दिलेल्या निकालात चुकीच्या किंवा भ्रम निर्माण करणाऱ्या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रिटींनाही जबाबदार धरण्यात येईल, असा स्पष्ट आदेश दिला होता.

# सिनेमागृहात कोणते चित्रपट

## परम सुंदरी




आज परम सुंदरी हा रोमँटिक कॉमेडी सिनेमा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. तुषार जलोटा दिग्दर्शित या सिनेमामध्ये अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री जान्हवी कपूर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सिद्धार्थ शंकर, मनजोत सिंग, संजय कपूर, इनायत वर्मा आदी कलाकार देखील या चित्रपटात आहेत. चित्रपटाची कथा गौरव मिश्रा आणि अर्श व्होरा यांनी लिहिली असून चित्रपटाचे संगीत सचिन-जिगर या जोडीने दिले आहे.

### कथानक:

परम सुंदरीचे कथानक केरळच्या पृष्ठभूमीवर घडते. दिल्लीतील एक तरुण एका दक्षिण भारतीय शास्त्रीय नर्तकीच्या प्रेमाची कथा या चित्रपटात दाखवण्यात आली आहे.

## त्रिभंधारी बर्बरीक




हा चित्रपट आज सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होत असून तेलुगू, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि हिंदीसह अनेक भाषांमध्ये हा चित्रपट पाहता येईल. मोहन श्रीवत्स यांचे दिग्दर्शन असलेला हा सिनेमा एक फॅन्टसी थ्रिलर आहे. या चित्रपटामध्ये सत्य राज, वशिष्ठ एन. सिन्हा, सांची राय, क्रांती किरण, उदयभानु, सत्यम राजेश, व्हीटीव्ही गणेश, मोटा राजेंद्र आणि अनेक कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.

# ओटीटीवर काय पहाल?

## 'मेट्रो इन दिनों'




दिग्दर्शक अनुराग बासू यांचा 'मेट्रो इन दिनों' हा चित्रपट आज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. आदित्य रॉय कपूर, सारा अली खान, पंकज त्रिपाठी, कोंकणा सेन शर्मा, नीना गुप्ता, अनुपम खेर, अली फजल आणि फातिमा सना शेख आदि कलाकार यामध्ये आहेत. मेट्रो इन दिवसांमध्ये हा चित्रपट ४ जुलै रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. अनुराग बासू दिग्दर्शित या मल्टीस्टारर चित्रपटामध्ये अनेक नामवंत कलाकार आहेत, तरीही हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करू शकला नाही.

# वीकेण्डला काय बघाल ?

**ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यातील नव्या वीकेण्डमध्ये अनेक दमदार नाटके, रोमँटिक कॉमेडी आणि जबरदस्त फाइट सीन पाहायला मिळणार आहेत. तेव्हा तयार व्हा आणि हा वीकेण्ड एन्जॉय करा.**

## कराटे किड - लेजंड




कुंग फूच्या टॅलेंटेड खेळाडू ली फोंग न्यूयॉर्क शहरात जातात, तेव्हा काहीच दिवसांत त्यांची भेट एका स्थानिक कराटे चॅम्पियनशी होते. मिस्टर हान आणि डॅनियल लारूसोच्या मार्गदर्शनाखाली ते कराटेची शेवटची स्पर्धा खेळण्यासाठी सज्ज होतात. ही सीरिज ३० ऑगस्ट रोजी नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राइम व्हिडिओ व झी ५ वर पहायला मिळेल.

## द टर्मिनल लिस्ट - डार्क वोल्फ सीझन १




ही ॲक्शन, थ्रिलर आणि ड्रामा असलेली सीरिज २७ ऑगस्टपासून ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित झाली आहे. यामध्ये टेलर किच, टॉम हॉपर, डार सॅलिम आणि रोना-ली शिमोन या नामांकित कलाकारांची खास उपस्थिती या सीरिजमध्ये पहायला मिळणार आहे.

## ॲटॉमिक




ही एक ब्रिटिश थ्रिलर वेब सीरिज आहे, जी काल २८ ऑगस्ट रोजी जिओहॉटस्टारवर प्रदर्शित झाली आहे. यात कथा दोन सर्वसाधारण माणसांची आहे. ते नकळतपणे उत्तर आफ्रिकेत एका भयानक कार्टेलच्या युरेनियम तस्करीच्या नेटवर्कमध्ये फसतात. परिस्थिती इतकी बिघडते की ते सरळ बॉम्बसमोर येऊन उभे राहतात. आता प्रश्न आहे की, ते आपला प्राण वाचवणार का, की मग धैर्य दाखवून संपूर्ण जगाचा संहार करणाऱ्या त्या बॉम्बच्या स्फोट होण्यापूर्वी काही मार्ग काढणार? एजन्सी आणि शस्त्रधारी तस्कर यांच्या जाळ्यातून सुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या या दोघांच्या प्रवासाची ही प्रत्येक क्षणी सस्पेन्स आणि शहारे आणणारी कथा आहे. या सीरिजमध्ये अल्फी एलन, शहजाद लतीफ, समीरा वाइली, अविताल लोवोवा, चार्ली मर्फी हे कलाकार आहेत, आणि हिंदी भाषेत देखील ही सीरिज बघायला मिळेल.

## 'टू ग्रेइव्हज '




स्पेनची ही रहस्यमयी थ्रिलर वेब सीरिज प्रेक्षकांना एका सस्पेन्स आणि गूढ जगात घेऊन जाते. कथा इसाबेला नावाच्या स्त्रीभोवती फिरते. तिची १६ वर्षांची नात वेरोनिका आणि तिची मैत्रीण मेंडी अचानक गायब होतात. पोलिसांच्या संथ तपासाला कंटाळून इसाबेला स्वत: एक अनधिकृत तपास सुरू करते. तिचा हा प्रवास केवळ सत्याचा शोध न घेता सूडाचा प्रवास बनतो. या कौटुंबिक, रहस्यमय कथेला गुन्ह्याची किनार आहे. नॉना कार्डोनर, अल्वारो मॉर्टे, होविक केउचकेरियन, कीटी मान्वर आदी कलाकार या सीरिजमध्ये आहेत. नेटफ्लिक्सवर ही सीरिज आजपासून पाहता येईल.

## 'रॅम्बो इन लव्ह'




'रॅम्बो इन लव्ह' ही तेलुगू रोमांटिक कॉमेडी वेब सीरिज आज जिओहॉटस्टारवर प्रदर्शित होत आहे. या वेब सीरिजची कथा एका अशा दिवाळे निघालेल्या व्यावसायिकाची आहे, जो आपल्या आयुष्याला सावरण्यासाठी पुन्हा एक गुंतवणूकदार शोधतो. परंतु नशीब त्याला पुन्हा एका नव्या वळणावर आणते. त्याचा नवा गुंतवणूकदार कोण आहे तर त्याची पूर्व प्रेयसी. जिला त्याने एकेकाळी दगा दिला होता. आता ही कथा एक व्यावसायिक आणि पैशांची राहात नाही, तर त्यात प्रेम, कॉमेडी, आणि नात्यातील जुन्या जखमा देखील सामील होतात. या रोमँटिक कॉमेडी सीरिजमध्ये पायल चेंगप्पा आणि अभिनव मणिकांत हे मुख्य कलाकार आहेत. हिंदी भाषेमध्ये ही सीरिज सिनेमा पाहता येईल.

# गौरवला बाबा बनायचे आहे



बिग बॉस सिझन १९ मधील स्पर्धक, 'अनुपमा' या मालिकेमुळे लोकप्रिय झालेला आणि सेलिब्रिटी मास्टरशेफ'चा विजेता गौरव खन्नाने बिग बॉसमधील एका प्रसंगात आपल्या वैयक्तिक जीवनावर केलेले भाष्य आता व्हायरल झाले आहे. एका प्रसंगात जेव्हा बिग बॉस १९ मधील स्पर्धक मृदुलने गौरवला विचारले, तुला मुलं व्हावे असे वाटत नाही का? त्यावर उत्तर देताना गौरवने सांगितले की त्याला बाबा बनायचे आहे, परंतु त्याच्या पत्नीला मुल नको आहेत. या बाबतीत नवरा-बायकोचे विचार वेगळे आहेत. गौरव खन्नाने आपली पत्नी आकांक्षा चमोला आणि कुटुंब नियोजनाबद्दल बोलताना सांगितले की मुलं ही मोठी जबाबदारी आहे. मी दिवसभर काम करतो; आणि जर माझी बायको नोकरी करायला लागली तर मुलाची योग्य काळजी होऊ शकणार नाही. आम्हाला मुलाची जबाबदारी दुसऱ्यावर सोपवायला आवडणार नाही. कदाचित दोन-तीन वर्षांनंतर आम्ही मुलाचा विचार करू.

# टी-सीरिजवर चोरीचा आरोप



अभिनेत्री क्रिती सेनॉन आणि शहीर शेख अभिनीत दो पत्ती सध्या खूप चर्चेत आहे, आणि याचे कारण हा सिनेमा नाही तर त्यातील रांझण हे गाणे आहे. परंतु आता हे गाणे तयार करणार्या टी-सीरिज म्युझिक कंपनीवर संगीतचोरीचा आरोप आला आहे. संगीताच्या चाली, बीट्स बनवणार्या एका आंतरराष्ट्रीय संगीतकाराने आरोप केला आहे की त्याची परवानगी न घेता रांझण गाण्यामध्ये त्याच्या बीट्सचा वापर केला गेला आहे आणि हे बीट दोन वर्षांपूर्वी तयार केले गेले होते. एका वर्षापर्यंत त्याला या चोरीबद्दल माहिती नव्हती आणि त्याला हेही कल्पना नव्हती की भारतात नंबर १ ट्रेंडिंग असलेल्या गाण्यामध्ये त्याच्या बीट्सचा वापर झाला आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत सदर आंतरराष्ट्रीय संगीतकार केएमकेझेड (KMKZ) ने सांगितले आहे, मी भारतात नंबर वन बनलेले गाणे बनवले आणि मला याची कळा नव्हती. मी एक म्युझिक निर्माता आहे. मी ऑनलाइन बीट्स विकतो. मी घचघन या नावाने ओळखला जातो. मी या बीट्स दोन वर्षांपूर्वी पोस्ट केल्या होत्या. काही दिवसांपूर्वी मला एका व्यक्तीने मेसेज पाठवला की त्याला एक गाणे मिळाले आहे आणि त्यात मी तयार केलेल्या बीट्स पियानोवर वाजत असल्याचे त्याने ओळखले आहे. मेसेज पाठवणार्याचे नाव लिहिलेले नव्हते परंतु त्याची इच्छा होती की मला ही गोष्ट कळावी.घचघन ने पुढे सांगितले की, मी पाहिले की स्पॉटिफायवर त्याच्या २९ कोटी स्ट्रीम्स आहेत आणि या गाण्याचे श्रेय पाहिल्यावर तुम्हाला दिसेल की श्रेय टी-सीरिजला देण्यात आले आहे. त्यामुळे मी ईमेल पाठवायला सुरुवात केली. मी गायक आणि टी-सीरिजच्या सर्व संबंधित लोकांना ईमेल केले.परंतु कुणाकडूनही मला उत्तर मिळाले नाही. त्यामुळे मला कळत नव्हते की आता मी काय करावे. कारण त्यांनी यूट्यूबवरून माझी चाल चोरी केली आहे आणि मला कोणताही संपर्क केला नाही, मला त्यासाठी पैसे दिले नाहीत आणि मला त्या चालीसाठी श्रेयही दिलेले नाही. आता हे रांझण गाणे भारतीय बिलबोर्डवर पहिल्या क्रमांकावर आहे. संगीत निर्माते लोकांना विनंती करतो की, ज्यांना या व्यक्तीपैकी कुणाचाही पत्ता माहिती असेल ते मदत करावी, जेणेकरून मी लवकरात लवकर रांझण व्हिडिओवाल्यांपर्यंत पोहचू शकेन. कृपया माझ्या या व्हिडिओवर कॉमेंट करा आणि माझा व्हिडिओ शक्य तितक्या लोकांपर्यंत शेअर करा.



# नम्र विकी...

विकी कौशल जितका चांगला अभिनेता आहे, तितकाच सरळ-साधा स्वभावाचा आहे. छावा या सिनेमातील आपल्या दमदार अभिनयाने त्याने प्रेक्षकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आपल्या नम्र स्वभावामुळे विकी नेहमीच आपल्या चाहत्यांची मने जिंकत असतो. नुकताच 'लव्ह अँड वॉर' या सिनेमाच्या शूटिंगनंतर मुंबईला परतलेल्या विकीने एअरपोर्टवर असे काही केले की सोशल मीडियावर लोक या अभिनेत्याचे मोठ्या प्रमाणावर कौतुक करत आहेत. विकी जेव्हा मुंबई एअरपोर्टवर उतरला तेव्हा त्याच्या एका चाहत्याने त्याला थांबवले व छत्रपती संभाजी महाराजांची एक शाल व एक मूर्ती विकीच्या हातात देऊ लागला. चाहत्याकडून छत्रपती संभाजी महाराजांची मूर्ती स्वीकारण्यापूर्वी विकीने कोणतेही न करता एअरपोर्टवर आपले शूज काढले आणि मग मान झुकवून मूर्तीचा स्वीकार केला. त्यानंतर त्याने आपल्या चाहत्यासह एक फोटोही काढला. विकीच्या या कृतीने सर्वांची मने जिंकली आहेत. एका युजरने लिहिले आहे, यार, याचे संस्कार किती चांगले आहेत. तर दुसऱ्याने लिहिले आहे, हा आता 'द विकी कौशल' बनला आहे.

# शमिताचा धक्कादायक खुलासा



अभिनेत्री शिल्पा शेट्टीची बहिण व अभिनेत्री शमिता कधीच फारशी यशस्वी झाली नव्हती. मात्र बिग बॉसमुळे ती पुन्हा एकदा प्रसिद्धीमध्ये आली होती. आता शमिताने बिग बॉसमधील आपला अनुभव सांगत एक धक्कादायक खुलासा केला आहे. तिने हे मान्य केले आहे की या शोमुळे तिला हरवलेली ओळख पुन्हा मिळाली खरी, परंतु या शोमुळे तिच्या मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम झाले होते. शमिताने सांगितले की शो संपल्यानंतर तिला जवळपास एक वर्ष प्रोफेशनल थेरपीची गरज भासली होती. ती म्हणाली की, बिग बॉसमधून बाहेर आल्यावर मला कळतच नव्हते की माझ्या आजूबाजूला काय चालले आहे आणि मी योग्य पद्धतीने गोष्टींवर प्रतिक्रिया देत आहे की नाही. माझ्या मनातील भीती इतकी वाढली होती की मी खूप आक्रमक झाली होते. हा शो सोडल्यानंतर मी अनामिक भीती आणि भासांमुळे त्रस्त झाली होते. मला वाटते की बिग बॉसबद्दलच्या घरात मी सतत भांडत होते. सकाळीपासून संध्याकाळपर्यंत सतत प्रत्येक गोष्टीशी वाद घालणे ही काही चांगली बाब नाही.

# आम्ही नातेवाईक आहोत, पण...




हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये असे अनेक सेलिब्रिटी आहेत ज्यांचे एकमेकांशी जवळचे नाते आहे. कुणाकुणाची भावाभावांची जोडी तर कुणाची काका-पुतण्याची जोडी प्रसिद्ध आहे. यापैकी काहींनी मोठ्या भावाचे अनुकरण करून चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले आणि अभिनयात कारकिर्द घडवली. याची ठळक उदाहरणे म्हणजे जेष्ठ दिवंगत अभिनेता अशोक कुमार-अनूप कुमार, जेष्ठ अभिनेता अनुपम खेर-राजू खेर. त्याचप्रमाणे सनी-बॉबी देओल, सलमान खान व अरबाज-सोहेल खान. परंतु तुम्हाला माहिती आहे का की अभिनेता विवेक ओबेरॉयचा चुलतभाऊ देखील काही हिट चित्रपटांत काम केलेला आहे? हा अभिनेता आहे अक्षय ओबेरॉय. 'फाइटर', 'लव्ह हॉस्टल', 'फितूर' आणि 'पीकू' सारख्या चित्रपटांमधील आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण करणाऱ्या अक्षयने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान आपल्या कुटुंब व नातेवाईकांबद्दल मनमोकळेपणाने चर्चा केली. अक्षयने सांगितले की विवेक ओबेरॉय त्याचा चुलतभाऊ आहे. परंतु आपल्या कारकिर्दीसाठी त्याने कधीही विवेक किंवा काका सुरेश ओबेरॉय यांच्या नावाचा उपयोग केला नाही. आपण संघर्ष करून यश मिळवल्याचे तो म्हणाला. त्याने हे देखील सांगितले की, विवेक ओबेरॉयच्या कुटुंबाशी त्याचे नाते असले तरी दोन्ही कुटुंबांचे संबंध कधी चांगले नव्हते. विवेक आणि त्याचे वडील दोघेही चांगले अभिनेता आहेत आणि माझ्या नातेवाईक असल्याचा मला अभिमान आहे, परंतु आम्ही एकत्र काम करू शकलो असतो तर चांगले झाले असते.

# सुचित्रासह मारपीट

सुप्रसिध्द गायिका आणि माजी रेडिओ जॉकी सुचित्राने नुकताच एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामुळे तिची चर्चा सुरू झाली आहे. या व्हिडिओमध्ये सुचित्राने ज्या मुलाशी तिचा साखरपुडा झाला आहे, त्या मुलाने तिला मारल्याचा आरोप केला आहे. तिने सांगितले आहे की चेन्नई हायकोर्टात वकील असलेल्या शुनमुगराजने तिला अनेकदा मारले आणि आर्थिक छळही केला. शिवाय त्याने तिच्या चेन्नईमधील घरावरही कब्जा केला आहे. सुचित्राचा आरोप आहे की तिचा भावी पती तिला शारीरिक व मानसिक छळ करतो. सुचित्राच्या या व्हिडिओने सर्वांचे लक्ष वेधले आहे. तिने आपल्या भावी पतीवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. व्हिडिओमध्ये सुचित्रा म्हणते की, माझा भावी पती मला चपल्याने मारत असे. तो एखाद्या पेहलवानासारखाच मला मारत असे. मी त्याला म्हणेने की असे करु नकोस, पण तो मारणे थांबवत नसे. त्यामुळे मी एका कोपऱ्यात रडत बसायचे. आपल्या या व्हिडिओखाली सुचित्राने एक मोठे कॅप्शन लिहिले आहे. तिने लिहिले आहे की, या नात्यात मी मार खाती राहिले. मी शुनमुगराजला सुधारण्याची अनेक वेळा संधी दिली. मी खूप काही सहन केले आहे. परंतु तो मला मारत राहिला. या सर्व प्रकारांमुळे मी आता त्याच्याविरुद्ध कायदेशीर मदत घेणार आहे. सुचित्राने हे देखील लिहिले आहे की, मी हार मानणार नाही. शुनमुगराजने माझ्या मेहनतीचे पैसे खाल्ले आहेत. गेली पाच वर्षे ती शुनमुगराजला ओळखत आहे आणि त्याच्यासह तिचा साखरपुडा झाला होता.



## नवाकाळ शब्दकोडे-१३५६



**आडवे शब्द –**

१. पोशाख ५. गूढ, खोल ८. म्हणून, यासाठी ११. स्फूर्ती, प्रेरणा १२. दृष्टभेट १४. अजाण, माहिती नसलेला १६. वर्ण १७. कैकेयीला चुकीचा सल्ला देणारी १८. शंभर १९. संसार २१. चुलता २२. भिंतीला पडलेले भगदाड २३. तृण, चारा २५. विष २७. रोमांचकारी २९. अस्वल ३२. आपला राष्ट्रीय पक्षी ३३. बांबू ३५. गायब ३७. साखरेचा हा प्रकार गुलकंद आणि प्रसादात वापरतात ३८. वस्त्र ४१. अग्र ४२. रीत ४३. डोक्यावर तुरा असलेला एक स्थलांतरित पक्षी, ब्राह्मणी बदक ४४. भाकरीचे पीठ मळण्याची मोठी परात ४५. भयंकर ४६. पहारा, गस्त ४८. कुभांड ४९. प्रवास ५१. तीव्र इच्छा ५४. विचारधारा ५५. तुळईला आधार देणारा खांब ५७. मसाल्याच्या पदार्थातील एक, हिचे तेल दातदुखीवर गुणकारी मानतात. ५८. नर मांजर ५९. प्रार्थनेचा एक प्रकार ६०. दुधातली बंगाली मिठाई ६२. अंगयष्टी, सोवळ्यातले रेशमी वस्त्र ६३. मनातला द्वेष ६५. चांदीच्या पंचकोनी पत्र्यावर कोरलेल्या कुलदैवतांच्या प्रतिमा ६६. एक औषधी कंद ६७. संघर्ष ६९. दशरथाचे वडील, रामाचे आजोबा ७०. संत एकनाथांचा एक काव्यप्रकार ७१. त्वरित ७४. कावळ्याचे ओरडणे ७६. वडिलांची बहीण ७७. एक चपळ प्राणी ७९. नव्याचे कौतुक ८२. पिठीसाखरेचा प्रकार, तगार ८३. पोळीचे धान्य ८५. कौतुक करणे ८७. रेल्वेतला स्लीपर कोच ९१. खांबावर आडवी टाकलेली तुळई ९३. नूतन ९४. सौख्य ९७. आश्रय ९८. तांब्या १००. बेशुद्धी १०१. चमकणारे, स्वच्छ १०२. ठार करणे १०३. मारामारी १०४. उपयोग १०५. काम टाळणारा १०७. स्वतःचा रंग बदलणारा प्राणी १०८. धिप्पाड वानर १०९. प्रसिद्ध, यशस्वी ११०. मच्छर १११. सुंदर

**उभे शब्द –** १. बोटाचा एक भाग, उसाचा डोळा २. मारुती ३. सिंह ४. व्यासांचे वडील ५. हत्ती ६. चणे, सोलाणे ७. एक अप्सरा, शकुंतलेची आई ८. अजाण ९. कंटाळवाणी गोष्ट, लांबण १०. म्हैस ११. ठिणगी १३. झुकलेला १५. भिक्षेकरी २०. अवांतर, इतर २४. वगळलेले २६. भारावलेला, खुश झालेला २७. भीतीने सुटलेले कापरे २८. वेदना ३०. जुगार ३१. संतापाची लहर ३४. वाडगा ३६. सुक्या भाजीसाठी केलेल्या बटाट्याच्या पातळ फोडी ३७. खांद्याचा व हाताचा सांधा ३९. लोखंडाचे सोने करणारा दगड, स्पर्शमणी ४१. झगडा ४२. शोध ४४. जुन्या काळातील पोलीसप्रमुख ४५. रानमेव्यातील एक ४७. पूर्वसूचना न देता, अचानक ४८. रागाने सैरभैर झालेला ५०. नावाची पाटी ५२. विस्तृत ५३. करमणूक करणारे ५६. मैत्रीण ५९. मोठे स्वयंपाकघर ६१. कुस्तीगीर ६३. याच दिवशी ६४. निषेधार्थ सभेतून निघून जाणे ६६. नीट रचून ठेवणे ६८. बांगलादेशची राजधानी ६९. आवेश ७२. तुच्छ ७३. फुलांचा गुच्छ ७५. बालकृष्णाने या नागाचा बीमोड केला ७८. पाठवणी ८०. छाती ८१. देव ८४. अफवा ८६. सातू ८८. सवडीनुसार ८९. नीच माणूस ९०. गायब ९२. मेघगर्जना ९४. सुलभ, सोपे ९५. ढिगारा ९६. इथवर ९८. सांडपाण्याचा नाला ९९. पांथस्थ १००. गुहा १०१. पादत्राणांचा सुटसुटीत प्रकार १०३. उत्तम १०४. पंढरीची पायी यात्रा १०६. काचेच्या बांगड्या •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३५५चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. आपकमाई ६. जलौघ ९. ओनामा ११. पडळ १२. कांजीवरम १५. किरकोळ १७. अलाहिदा १९. नौदल २०. विळी २१. उठाठेव २३. माष २४. मस २६. सफलता २७. कासावीस २९. दधीची ३१. रायगड ३२. नदी ३४. रिपू ३५. नट ३६. खाक ३७. तलाव ४०. मघा ४१. मेज ४२. चापट ४४. नवशिका ४६. हसतमुख ४८. सावट ४९. मनुका ५०. लिप्त ५२. नकील ५३. फुकट ५४. हादरा ५५. भुयार ५६. जलद ५८. गादी ६०. तूट ६१. गमजा ६४. राग ६६. पगारदार ७०. गोचर ७२. मटकावणे ७४. जतन ७५. अपरा ७६. भडक ७७. नस ७८. क्षर ७९. शूलपाणि ८०. चोर ८१. वाफा ८३. वानर ८४. खर ८५. रकाना ८७. शची ८८. प्रभंजन ८९. वाद ९०. कलासाधक ९३. वीरश्री ९५. परामर्श ९६. टवटवी ९८. वारस ९९. तारवट १०१. माकड १०४. दहन १०५. स्वर्ग १०६. रामरक्षा

**उभे शब्द :** १. आडमुठा २. पळ ३. मामला ४. फौजी ५. पारद ७. लौकिक ८. घर ९. ओळ १०. मासोळी १२. कांदा १३. वनौषधी १४. मलम १६. कोरफड १७. अवसानघातकी १८. हिडीस २०. वितान २१. उर्वरित २२. ठेका २३. मादक २५. सराव २६. सगळे २८. वीट ३०. चीतपट ३३. दीर्घिका ३६. खाज ३८. लाट ३९. अवलिया ४०. मसनद ४१. मेख ४२. चावट ४३. अनुराग ४५. शिप्तर ४७. मुलगा ४८. साकसुरत ४९. मद ५१. अजरामर ५४. हाट ५५. भुजा ५७. लगट ५९. दीप ६०. तूर ६२. मती ६३. स्वैर ६५. अवसर ६७. गाजर ६८. दानशूर ६९. लापणिका ७०. गोड ७१. चकवा ७३. कानन ७६. अपारदर्शक ७६. भरमसाट ७८. क्षणभंगूर ८२. फाया ८३. वाचीवीर ८४. खनपट ८६. नाकर्ता ८९. वाममार्ग ९१. धवळार ९२. कट ९४. रसद ९७. वीणा ९८. वादी ९९.तान १००. वजा १०२. डच्चू १०३. होरा

## बिहारमध्ये वाद सुरू असतानाच प.बंगालमध्ये याद्या तपासणी

पान १ वरून

राज्य निवडणूक आयोगाला मतदार याद्यांच्या फेरतपासणीच्या तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगात रिक्त असलेली अधिकाऱ्यांची पदे त्वरित भरण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने प.बंगालच्या मुख्य सचिवांना नुकतेच एका पत्राद्वारे दिले आहेत.

प. बंगालमध्ये पुढील वर्षी मार्च-एप्रिलदरम्यान विधानसभा निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार याद्या फेरतपासणीसाठी ही तयारी चालविली आहे. त्यावरून ममता बॅनर्जी आणि केंद्र सरकार यांच्यात पुन्हा एकदा संघर्ष होणे अटळ आहे.

## उध्दव-राज २० वर्षांनी सहकुटुंब भेट

पान १ वरून-

मला वाटते की, श्रीगणेशाने सुबुद्धी दिली आहे. त्यामुळे दोन्ही भाऊ एकत्र आले आहेत. आता एकत्रित राहावे. दोन्ही भावांना अशीच सुबुद्धी मिळत राहावी, अशी श्रीगणेशाच्या चरणी मी प्रार्थना करतो. यावर खासदार संजय राऊत यांनी ठाकरे हे सुबुद्धी घेऊनच जन्माला येतात, असे सांगत फडणवीसांवर पलटवार केला. फडणवीसांनी महाराष्ट्र कल्याणासाठी आणि महाराष्ट्रावरील राजकीय संकट दूर व्हावे, अशी कामना राज ठाकरेंच्या गणेशाकडे केली असेल, असेही ते म्हणाले.

## दोन गुन्हेगार सुप्रिम कोर्टात निर्दोष सुटले

पान १ वरून

आरोपींनीच हे कृत्य केले हे सिध्द करण्यासाठी ठोस पुरावा सादर करणे अत्यंत आवश्यक असते. या खटल्यात पोलिसांनी आपली कामगिरी चोख बजावली नाही, असे स्पष्ट दिसून येते, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने तपासाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

## विरारमध्ये इमारत कोसळली १७ जणांचा मृत्यू! ९ जखमी

पान १ वरून

मृत्यू झाला असून ९ जणांवर उपचार सुरू आहेत.

मृतांमध्ये आरोही जोवील (२४), उत्कर्षा जोवील (१), लक्ष्मण किसकु सिंग (२६), दिनेश सकपाळ (४३), सुप्रिया निवळकर (३८), अर्णव निवळकर (११), पार्वती सकपाळ (६०), दिपेश सोनी (४१), सचिन नेवाळकर (४०), हरिश सिंग बिष्ट (३४), सोनाली रुपेश तेजाम (४१), दिपक सिंग बोहरा (२५), कशिश पवन सहेनी (३५), शुभांगी पवन सहेनी (४०), गोविंद सिंग रावत (२८) यांचा समावेश आहे. आणखी दोन मृतांची ओळख पटलेली नाही. जखमींमध्ये प्रभावकर (५७), प्रमिला प्रभाकर शिंदे (५०), प्रेरणा शिंदे (२०), प्रदीप कदम (४०), जयश्री कदम (३३), मिताली परमार (२८), संजय स्वपंत सिंग (२४), मंथन शिंदे (१९), विशाखा जोवील (२४) यांचा समावेश असून त्यांच्यावर वसई, नालासोपारा व विरार येथील विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. यापैकी ३ जणांना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून ६ जणांवर उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर वसई-विरार महापालिकेने इमारत बांधणाऱ्या बिल्डरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. नितल गोपीनाथ साने या बांधकाम व्यावसायिकाला विरार पोलिसांनी अटक केली असून, जागेच्या मालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की, ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. शासनाने त्या इमारतीला एक महिन्यापूर्वी नोटीस दिली होती. त्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगितले होते. या घटनेमधील मृतांच्या कुटुंबियांना ५ लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

**पहिला वाढदिवस ठरला शेवटचा**

२६ ऑगस्ट हा उत्कर्षाचा पहिलाच वाढदिवस होता. दिवसभर कुटुंबीय व नातेवाईकांसोबत आनंदात हा दिवस साजरा करण्यात आला होता. चौथ्या मजल्यावरील त्यांच्या घरी छोटेखानी कार्यक्रम आयोजित झाला. उत्साहात केक कापण्यात आला, एकमेकांना तो भरवण्यात आला, हशा आणि आनंदाचे वातावरण होते. पण, वाढदिवसाचा हा आनंद क्षणिक ठरला. रात्री उशिरा रमाबाई अपार्टमेंटचा काही भाग कोसळला आणि मायलेकींचे आयुष्य संपले. उत्कर्षा आणि तिची आई आरोहीचा मृत्यू झाला.

## अमेरिकेच्या वाढीव टॅरीफमुळे भारतातील लाखो नोकऱ्या धोक्यात

पान १ वरून

अभियांत्रिकी वस्तुंची निर्यात मागील वर्षी १.७ लाख कोटी रुपये होती. त्यामध्ये चालू वर्षी प्रचंड घट होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे बहुमुल्य रत्ने आणि दागदागिन्यांच्या क्षेत्राची निर्यात ९० हजार कोटी रुपये होती. त्यालाही मोठा फटका बसणार आहे. पूर्ण बहरात असलेला देशाचा इलेक्ट्रॉनिक साहित्याची निर्यातदेखील मोठ्या प्रमाणात रोडावणार आहे. आतापर्यंत ज्या वस्तुंवर अमेरिकेत १० टक्के आयात शुल्क आकारले जात होते त्या वस्तुंवर यापुढे थेट ५० टक्क्यांवर गेल्यामुळे या वस्तुंच्या किमती अमेरिकन ग्राहकांसाठी अत्यंत महागड्या ठरणार आहेत. औषध निर्मिती क्षेत्रातील निर्यात मागील वर्षी ९२ हजार कोटी रुपये होती. औषधांवर अमेरिकेत आयात शुल्क माफ होते. आता तेच ५० टक्के आकारले जात असल्यामुळे या क्षेत्राचे अतोनात नुकसान होईल, असे गोयल यांनी पुढे म्हटले आहे.

**SHREEJI BHATIA CO-OP. BANK LTD.**
Head Office: 1A/112, Yusuf Meherali Road, Masjid Bunder, Mumbai – 400003.

**NOTICE**

Members are hereby informed that our bank's virtual Annual General Meeting is scheduled on 12th September 2025 at 3.00pm to transact business as per the notice of the agenda.
Details of the link for attending the meeting will be provided to the shareholders on their mobile numbers registered with the bank.
In the absence of the Quorum, the meeting will be adjourned.
Adjourned meeting will be conducted at 3.30 pm.
By Order of the Board of Directors,
Chief Executive Officer
Place :- Mumbai
Date:- 29th August 2025
Note:- Members are requested to be KYC compliant.

LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD
**एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**
CIN L65922MH1989PLC052257
**नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय:** १३१ मेकर टॉवर्स, "एफ" प्रिमायसेस, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई – ४०० ००५.
**दूरध्वनी:** +९१ २२ २२१७८६००, **फॅक्स:** +९१ २२ २२१७८७७७
**ईमेल:** lichousing@lichousing.com | **वेबसाइट:** www.lichousing.com

**सार्वजनिक सूचना**

एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड. याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि इतर सर्व भागधारकांच्या निदर्शनास आणू इच्छिते की, दिनांक ०२.०८.२०२५ पासून, कंपनीचे कफ परेड, मुंबई येथील कॉर्पोरेट कार्यालय एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे कॉर्पोरेट कार्यालय आणि नोंदणीकृत कार्यालय म्हणून पुनर्निधारीत करण्यात आले आहे.
पूर्वीचे नोंदणीकृत कार्यालय (आता प्रशासकीय कार्यालय म्हणून सुरू आहे): एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, बॉम्बे लाइफ बिल्डिंग, दुसरा मजला, ४५/४७ वीर नरिमन रोड, फोर्ट, मुंबई –४००००१.
नवीन नोंदणीकृत कार्यालय आणि कॉर्पोरेट कार्यालय (पुनर्निधारीत):
एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, १३१ मेकर टॉवर्स, "एफ" प्रिमायसेस, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई –४००००५.
फोर्ट, मुंबई येथील कंपनीचे कार्यालय एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्रशासकीय कार्यालय म्हणून कायम राहील, परंतु ह्यापुढे नोंदणीकृत कार्यालय म्हणून कार्यरत असणार नाही.
सही/–
तारीख: २९/०८/२०२५ महाव्यवस्थापक (ओएस आणि इस्टेट्स)
ठिकाण: मुंबई कॉर्पोरेट ऑफिस

**जाहीर सूचना**

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझ्या अशिलांच्या सूचनेनुसार, मी याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेकरिता ("सदर मालमत्ता") मे. कर्नाटक ट्रेडींग कं., भागिदारी संस्था, व्यवसायाचे प्रमुख ठिकाण - १०४, चकाला स्ट्रीट, मस्जिद बंदर, मुंबई - ४००००३ ("मालक") यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहे आणि माझे अशील मालकांकडून सदर मालमत्ता खरेदी करण्यास इच्छुक आहेत ("प्रस्तावित व्यवहार").
कोणा व्यक्तीचा सदर मालमत्ता किंवा तिच्या भागाच्या संदर्भात विक्री, विक्रीकरिता करारपत्र, वाटप, हस्तांतरण, अभिहस्तांकन, देवाणघेवाण, गहाणवट (मूळ शीर्षक करारनाम्याच्या ठेवीद्वारे आणि/किंवा अन्यथा समाविष्ट), धारणाधिकार, प्रभार, भेट, वारसा, ताबा, भोगवटा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेकरू, पोट-भाडेकरू, परवाना, काळजीवाहू आधारे, न्यास, देखभाल, वहिवाट, संपादन, मागणी, कोणताही बोजा किंवा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभार्थी अधिकार/हितसंबंध, वहिवाटीचा हक्क किंवा सर्वप्रथम खरेदी किंवा कोणत्याही करारपत्र किंवा इतर रचनेअंतर्गत किंवा कोणत्याही दावा, हुकूम, मनाई आदेश किंवा जप्ती किंवा कोणत्याही न्यायालय किंवा प्राधिकरणाद्वारे पारित निवाडा, खटला, प्रलंबित कायदेशीर कारवाई, कोणत्याही निर्णय प्राधिकरणाचा हुकूम किंवा आदेश, विभागणी, मुखत्यार पत्र, इच्छापत्र, मृत्युपत्र, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा, मागणी, हिस्सा, हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध ("दावा") असल्यास, त्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांच्या प्रतिंसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदनिका क्र. ५०२, ५ वा मजला, ए विंग, कॉसमॉस नेस्ट, धोकळी नाका, कोलशेत रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०७ येथे या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास असे मानण्यात येईल की, कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा असे कोणतेही दावे किंवा आक्षेप, जर असल्यास, सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि माझे अशील मालकांसोबत सदर मालमत्तेकरिता प्रस्तावित व्यवहार पूर्ण करतील.

**वरील उल्लेखित अनुसूची**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

१०२/१०४, शेरिफ देवजी स्ट्रीट, ४३ आणि ४३/ए (धोबी स्ट्रीट), मांडवी विभाग, मुंबई - ४००००३ चा सीएस क्र. ४६० येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या "वल्लभ दर्शन" या इमारतीच्या तळमजल्यावरील दुकान क्र. ३ मोजमाप अदमासे ३९.९२ चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्रफळ व त्यासह लॉफ्ट क्षेत्र मोजमाप अदमासे ३४.५६ चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्रफळ, एकूण अदमासे ७४.४८ चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्रफळ ही जागा आणि वल्लभ दर्शन टेनंट्स प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० च्या तरतुदींअंतर्गत योग्यरित्या नोंदणीकृत संस्था, नोंदणी क्र. एमयूएम/डब्ल्यू(बी)/एचएसजी/टीसी/८७६२/२०१५-२०१६, दि. ९ फेब्रुवारी, २०१६, नोंदणीकृत कार्यालय - १०२/१०४, शेरिफ देवजी स्ट्रीट, ४३ आणि ४३/ए (धोबी स्ट्रीट), मांडवी विभागाचा सीएस क्र. ४६०, मुंबई - ४००००३ यांच्याद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. २ दिनांक १६ नोव्हेंबर, २०२० अन्वये डिस्टिंक्टिव्ह क्र. २१ ते ४० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकी चे २० (वीस) समभाग.

दिनांक २९ ऑगस्ट, २०२५
सही/-
युसूफ ए इंदोरवाला
ॲडव्होकेट, मुंबई उच्च न्यायालय

## वैष्णोदेवी भूस्खलनात ३४ मृत्यू मृतांच्या कुटुंबियांना ९ लाख देणार

पान १ वरून

लाख रुपये देवस्थान समितीकडून, तर ४ लाख रुपये एसडीआरएफकडून दिले जाणार आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भूस्खलन झाले. तीन महत्त्वाचे पूल कोसळले, काही भागांतील वीज व पाणीपुरवठा खंडित झाला तर मोबाईल व इंटरनेट सेवा विस्कळीत झाली आहे.

मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पंतप्रधानांशी संपर्क साधून पूरस्थितीची माहिती दिली. देवस्थान समितीकडून मृतांचे पार्थिव शरीर त्यांच्या मूळ गावी पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

जम्मू-काश्मीरचे उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी यांनी उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्यावर आरोप करत म्हटले की, ढगफुटी व दरड कोसळण्याचा इशारा होता. तरीही यात्रा थांबवली नाही.

त्यामुळे मृत्यू झाले नाहीत. हत्या झाली आहे. त्यांनी या प्रकरणात गंभीर कटकारस्थान केले आहे. पंतप्रधान व गृहमंत्री अमित शहा यांनी याप्रकरणी उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करावी. सिन्हा आणि संबंधित अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करावे.

## यंदा नवापूर शहरात गणेशाचे आगमन खड्ड्यातून

**नंदुरबार** - यंदा नवापूर शहरात पहिल्यांदाच गणपती बाप्पाचे आगमन खड्डेमय रस्त्यातून झाले. ढोल-ताशांचा गजर, रोषणाई आणि भक्तांचा उत्साह असला तरी गणपती बाप्पाला घरी आणि मंडपात नेताना खड्ड्यातून मोठी कसरत करावी लागली. यामुळे यंदा भाविकांच्या आनंदावर पाणी फेरले गेल्याची भावना व्यक्त केली जात होती.

## जीएसआय अहवालानुसार देशात दरडप्रवण क्षेत्रांची वाढ

ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला किश्तवाड जिल्ह्यात मचैल माता यात्रेदरम्यान ढगफुटी झाली. त्यापूर्वी उत्तराखंडमध्ये धारावी येथेही अशीच दुर्घटना घडली. यातील मृतांपैकी बहुतांश लोक बेपत्ता असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया (जीएसआय)च्या अहवालानुसार, देशात ८७,४७४ सक्रिय दरडप्रवण क्षेत्र आहेत. त्यामध्ये १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील १७९ जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये अरुणाचल, हिमाचल, उत्तराखंड सर्वाधिक धोक्याचा प्रदेश आहे. रुद्रप्रयाग, चमोली, उत्तरकाशी आणि टिहरी गढवाल हे जिल्हे सर्वाधिक धोकादायक आहेत. दरडी वाढण्यामागे पावसाळी अतिवृष्टी, ढगफुटी, आणि मानवी हस्तक्षेप (रस्ते रुंदीकरण, जलविद्युत प्रकल्प, अतिक्रमण) कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. राज्य सरकारने ५३ हॉटस्पॉट्स ओळखून उपाययोजना सुरू केल्या आहेत. दरवर्षी मोसमी पावसामुळे दरड दुर्घटनांमध्ये वाढ होत आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, मिझोराम, सिक्कीम, मेघालय ही राज्येही दरडप्रवण असल्याचे जीएसआयने स्पष्ट केले आहे.

**NOTICE**

Notice is hereby given that we the Owner/Developer, M/s. A P Developers, having our office Address – Building No.17, Mayur Society, Kherwadi, Near L.S. Raheja College, Bandra East, Mumbai 400 051. Intending to develop the cessed property more particularly described in the schedule here under the provision of MHADA and which property is free from all encumbrance and charges and its occupied by the Tenant/Occupants a list where of is given as follows:

**MIRANDA MANSION, Plot No. 48, survey No. 56/74 and City Survey No. 2/2569, situated at Ganesh Galli, Lalbaug, Mumbai - 400 012.**

| Sr. No | Name of Tenants | Name of Occupants | Floor | Room No | User Resi. As per Actual |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | GROUND FLOOR | | | | |
| 1. | Mr. Satish Laxman Sawant | Mr. Satish Laxman Sawant | GRD | 1 | R |
| 2. | Mrs. Preeti Prakash Mahadik | Mrs. Preeti Prakash Mahadik | GRD | 2 | R |
| 3. | Mr. Umesh Rajaram Shetkar | Mr. Umesh Rajaram Shetkar | GRD | 3 | R |
| 4. | Ms. Rasika Ravindra Gaikwad | Ms. Rasika Ravindra Gaikwad | GRD | 4 | R |
| 5. | Mr. Kiran Keshav Yeram | Mr. Kiran Keshav Yeram | GRD | 5 | R |
| | FIRST FLOOR | | | | |
| 6. | Kept in Abeyance | Kept in Abeyance | 1ST | 6 | R |
| 7. | Kept in Abeyance | Kept in Abeyance | 1ST | 7 | R |
| 8. | Kept in Abeyance | Kept in Abeyance | 1ST | 8 | R |
| 9. | Mr. Sewa Singh Manohar Singh Oberio | Mr. Sewa Singh Manohar Singh Oberio | 1ST | 9 | R |
| 10. | Ms. Anisha Surendra Panchal | Ms. Anisha Surendra Panchal | 1ST | 10 | R |
| | SECOND FLOOR | | | | |
| 11 | Mrs. Vijaya Bhikaji Kanade | Mrs. Vijaya Bhikaji Kanade | 2ND | 11 | R |
| 12 | Mr. Bharatbhushan Bhagwan Rawool | Mr. Bharatbhushan Bhagwan Rawool | 2ND | 12 | R |
| 13 | Kept in Abeyance | Kept in Abeyance | 2ND | 13 | R |
| 14 | Kept in Abeyance | Kept in Abeyance | 2ND | 14 | R |
| 15 | Kept in Abeyance | Kept in Abeyance | 2ND | 15 | R |

"All person having claim or interest against or the said property, room/ premises or part thereof in respect of the tenancies of the aforesaid tenant/Occupant of by way of sale, assignment, Mortage, trust, ilen, gift, charge, possession, inhertiage, lease, tenancy, maintenance, easement or otherwise however are hereby required to make the name known in writing to the under-signed at their office given as below within 10 days from the date of publication hereto failing which we shall proceed with the development without any reference to such claim, if any and the same shall be considered as waived.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

All that piece and parcel of land and ground along with structures standing thereon situated lying and being on plot bearing. C.S. No.. 56/74, Plot no.48, of Parel Shivdi Division, bearing Municipal Ward F South Mumbai. Admeasuring area = 306.86 sq.mtr. Or thereabouts.

Date : 29th August 2025
Place: Mumbai
Sd/-
M/s A P Developers



धान्य व्यापारी सांस्कृतिक मंडळ लक्ष्मीपुरी कोल्हापूर पर्यावरण पूरक गणेश मूर्ती, वर्ष ४५



मुंबईचा राजा गणेशगल्ली येथे उद्धव ठाकरे यांनी दर्शन घेतले.

# गणेशोत्सव काळात ४ दिवस अटींसह ध्वनीक्षेपक वाजणार

■ मुंबई

**मुंबई** उपनगर जिल्ह्यात गणेशोत्सव काळात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास मर्यादित कालावधीत परवानगी देण्यात आली आहे.

ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या तरतुदीनुसार, यंदा १५ दिवसांपैकी १३ दिवसांसाठी सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम आणि धार्मिक कारणास्तव ध्वनीक्षेपक वापरण्याची मुभा आहे. त्यानुसार २८ ऑगस्ट (दुसरा दिवस), १ सप्टेंबर (पाचवा दिवस), २ सप्टेंबर (गौरी विसर्जन) आणि ६ सप्टेंबर (अनंत चतुर्दशी) या चार दिवसांसाठी विशेष परवानगी देण्यात आली आहे. या परवानगीसाठी काही अटी लागू राहणार आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून चीन आणि जपानच्या दौऱ्यावर

■ नवी दिल्ली

**अमेरिकेने** भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयात करवसुली सुरू केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदाच विदेश दौऱ्यावर जाणार आहेत. ते उद्या २९ ऑगस्टपासून चार दिवस जपान आणि चीन दौऱ्यावर असतील. २०२० मध्ये लडाखच्या गलवान खोऱ्यात भारत-चीनमधील लष्करी संघर्षानंतर पंतप्रधान हे पहिल्यांदाच चीन दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे या दौऱ्याकडे दोन्ही देशांसोबतच संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरणामुळे भारत पुन्हा हिंदी-चिनी भाई भाई या नाऱ्याला अनुसरून चीनसोबत दीर्घकालीन हातमिळवणी करणार का, हे महत्त्वाचे आहे.

१५ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान २९ आणि ३० ऑगस्टला जपान दौऱ्यावर असतील. पंतप्रधान झाल्यापासूनचा नरेंद्र मोदींचा हा आठवा जपान दौरा आहे. जपानचे विद्यमान पंतप्रधान शिगेरु इशिबा यांच्याशी त्यांची ही पहिलीच भेट असेल. या दौऱ्यात संरक्षण, सुरक्षा, व्यापार आणि अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या द्विपक्षीय भागिदारीवर चर्चा होईल.

यानंतर ३१ ऑगस्ट, १ सप्टेंबरला पंतप्रधान तियानजिन येथे होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनला रवाना होतील. हा पंतप्रधान मोदींचा सहावा चीन दौरा असून, सर्वाधिकवेळा चीन दौऱ्यावर जाणारे ते पहिले पंतप्रधान ठरले आहेत. आपल्या पहिल्या कार्यकाळातच पंतप्रधान मोदी पाचवेळा चीन दौऱ्यावर गेले होते. २०१५, २०१६, २०१७ मध्ये प्रत्येकी एकवेळा आणि २०१८ मध्ये



दोनवेळा चीनला भेट दिली.

चीन, रशिया, कझाकिस्तान, किर्गिस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान यांचा समावेश असलेल्या शांघाय सहकार्य संघटना (एससीओ) या प्रादेशिक आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना २००१ मध्ये करण्यात आली. २०१७ मध्ये भारत आणि पाकिस्तान या संघटनेचे सदस्य झाले. २०२३ मध्ये इराणही एससीओमध्ये सामील झाला.

पंतप्रधान मोदींचा हा चार दिवसांचा दौरा भारताच्या दीर्घकालीन परराष्ट्र धोरणासाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक देशांवर भरमसाट आयात शुल्क लावले आहे. चीन आणि जपान या दोन्ही देशांना याचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे अमेरिकेच्या धोरणाला उत्तर देण्यासाठी या दौऱ्यातून मार्ग काढला जाईल, अशी अपेक्षा आहे.

# फडणवीसांनी राजकारणासाठी मराठी एकजुटीच्या ठिकऱ्या उडवल्या

**संजय राऊत यांचा आरोप**

■ मुंबई

**मराठा** आरक्षणासाठी लढत असलेले मनोज जरांगे यांच्या पुन्हा सुरू झालेल्या आंदोलनावरून शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा घणाघाती टीका केली. फडणवीस यांनी मागील १० वर्षांत आपली सत्ता टिकवण्यासाठी मराठी एकजुटीच्या ठिकऱ्या उडवण्याचे काम केले, असे राऊत म्हणाले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात मराठी माणसांची एकजूट कायम राखण्यासाठी जीवापाड प्रयत्न केले. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या १० वर्षांत केवळ खुर्चीसाठी मराठी एकजुटीच्या ठिकऱ्या उडवल्या. जाती-जातींमध्ये फूट पाडून त्यांना एकमेकांविरूद्ध लढायला भाग पाडले. मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षणासाठीचे आंदोलन त्याचेच एक उदाहरण आहे, असा दावा राऊत यांनी केला.

मनोज जरांगेंच्या मागे मोठा मराठा समाज आहे. लाखोंच्या संख्येने जर मराठे मुंबईत येत असतील तर मुख्यमंत्री या नात्याने फडणवीस यांनी थेट त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. आपल्या शब्दाला जागून फडणवीसांनी मराठा समाजाच्या मागण्या समजून घेऊन त्या मान्य केल्या पाहिजेत. हा विषय खरेतर केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो. पंतप्रधान मोदी जगाला टोप्या घालत फिरतात. त्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घातले पाहिजे, असा टोलाही राऊत यांनी लगावला.

# मनसे पदाधिकाऱ्यांचा ३० ऑगस्टला मेळावा

■ ठाणे

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा शनिवार ३० ऑगस्ट रोजी ठाण्यात पार पडणार असल्याची माहिती मनसे नेते अविनाश जाधव यांनी दिली. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा महत्त्वाचा ठरणार आहे.

ठाण्यातील सी.के.पी. हॉल येथे सकाळी ११.३० वाजता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षप्रमुख राज ठाकरे स्वतः या मेळाव्यास उपस्थित राहून पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. महापालिका निवडणुकीत मनसे कोणत्या पद्धतीने तयारी करणार, कोणती भूमिका घेणार आणि प्रचारासाठी कोणती रणनिती आखली जाणार याबाबतच्या चर्चा या मेळाव्यात होण्याची शक्यता आहे.

# ४३०० कोटींच्या देणग्यांचा आयोग तपास करणार का?

■ नवी दिल्ली

**राहुल गांधींचा सवाल**

**गुजरातमधील** काही निनावी पक्षांना तब्बल ४,३०० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्याचे उघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला ४३०० कोटींच्या देणग्यांचा तपास करणार का? असा थेट सवाल केला आहे. राहुल गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, गुजरातमध्ये काही असे निनावी पक्ष आहेत ज्यांची नावे लोकांनी कधी ऐकलेली नाहीत. तरीदेखील त्यांना ४,३०० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत. हे पक्ष क्वचितच लहानमोठ्या निवडणुका लढवतात किंवा त्यावर पैसे खर्च करतात. मग हे हजारो कोटी रुपये कुठून येतात? हे पैसे कोण देत आहे? कोणाच्या खिशात जात आहेत? निवडणूक आयोग याचा तपास करणार आहे का? की तपासाऐवजी प्रतिज्ञापत्र मागेल? की मग कायदाच बदलून हा डेटा लपवला जाणार?

# अदानींनी १००० कोटींना दहावे जेट खरेदी केले

**अलाहाबादमध्ये जेट पोहोचले**

■ अहमदाबाद

**उद्योगपती** गौतम अदानी यांनी अमेरिकन विमान कंपनी बोईंगकडून सुमारे १००० कोटी रुपये किमतीचे एक आलिशान बिझनेस जेट (व्हीटी-आरएसए) खरेदी केले आहे. हे जेट ७३७-मॅक्स ८-बीबीजे मालिकेचे असून, ते एकदाच इंधन भरल्यानंतर भारतातून थेट अमेरिका-कॅनडापर्यंत पोहोचू शकते. अदानींच्या ताफ्यातले हे दहावे व्यावसायिक जेट विमान आहे.

अदानी यांच्या नवीन विमानाने स्वित्झर्लंडच्या बासेल शहरापासून ९ तासांत ६३०० किमी अंतर कापले आणि काल सकाळी १० वाजता अहमदाबाद विमानतळावर पोहोचले. या विमानाचे पाण्याच्या तोफांची सलामी देऊन स्वागत करण्यात आले. दरम्यान, २४ ऑगस्ट २०२४ मध्ये रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनीही या मालिकेतील एक विमान खरेदी केले होते. बोईंग ७३७ मॅक्स




२०० आसनी विमाने अकासा, एअर इंडिया एक्स्प्रेस, स्पाईसजेट या कंपन्यादेखील वापरतात. आता उद्योगपतीदेखील ही विमाने त्यांच्या वैयक्तिक वापरासाठी खरेदी करत आहेत.

# नगरसेवक जामसंडेकर हत्या प्रकरण अरुण गवळीला सुप्रीम कोर्टात जामीन

■ नवी दिल्ली

**शिवसेना** नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीला सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाला आहे. दीर्घ काळापासून गवळी जामिनासाठी अर्ज करत होता. परंतु त्याचे अर्ज वारंवार फेटाळले जात होते. अखेर आज सर्वोच्च न्यायालयात त्याला दिलासा मिळाला. मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावरच गवळीला हा जामीन मिळाला आहे.

गवळीच्या दीर्घ कारावासाचा कालावधी आणि त्याचे वय लक्षात घेऊन हा निर्णय देण्यात आला. अरुण गवळी १७ वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगात आहे आणि त्याचे वय आता ७६ वर्षांपेक्षा अधिक आहे, असे न्यायमूर्ती एम. सुंदरेश आणि एन. कोटिश्वर सिंह यांच्या पीठाने नमूद केले. कनिष्ठ न्यायालयाने लादलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहूनच हा जामीन मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाची अंतिम सुनावणी फेब्रुवारी २०२६ मध्ये ठेवण्यात आली आहे.

घाटकोपर येथे २ मार्च २००६ रोजी संध्याकाळच्या सुमारास ही हत्या झाली होती. नगरसेवक कमलाकर जामसंडेकर हे आपल्या घरात टीव्ही पाहत असताना अज्ञात गुंडांनी घरात घुसून त्यांच्यावर गोळीबार केला होता. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. या हत्याकांडाने त्यावेळी संपूर्ण मुंबई हादरली होती. त्यानंतर २०१२ मध्ये मुंबई सत्र न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा आणि १७ लाख रुपयांचा दंड ठोठावला. उच्च न्यायालयानेही हा निकाल कायम ठेवला. त्यानंतर गवळीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# नाशिकच्या शिंगवे बहुलात घरावर पॅराशूट कोसळले

■ नाशिक

**नाशिकमधील** देवळाली कॅम्प परिसरातील शिंगवे बहुला गावात आज सकाळी पॅराशूट एका घरावर कोसळल्याची घटना घडली. आर्टिलरी सेंटरचा जवान पॅराशूट सराव करत असताना अचानक तोल जाऊन पॅराशूट थेट गावातील एका घराच्या छपरावर कोसळले.

या अपघातात जवान जखमी झाला असून, त्याला तातडीने लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत. सुदैवाने घरातील कुणालाही इजा झाली नाही. मात्र अचानक पॅराशूट छपरावर कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. देवळाली कॅम्पमधील आर्टिलरी सेंटरमध्ये मोठ्या प्रमाणावर सराव सत्रे आयोजित केली जातात. त्याचाच भाग म्हणून हा जवान सराव करत असताना अपघात झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच लष्करी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन तातडीने मदतकार्य केले.

# रेल्वेतून फक्त ३५ किलो सामानच नेता येणार!

■ नवी दिल्ली

**रेल्वे** मंडळाने सामानाबाबत नियम लागू केला असून, लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. रेल्वेने प्रवास करताना आता प्रवाशांना विमानाप्रमाणेच मर्यादित ३५ किलोच सामान नेता येणार आहे. जास्त सामान असल्यास दंड भरावा लागेल.

सुरुवातीला ठराविक स्थानकांवर या नियमाची अंमलबजावणी केली जाईल. वजन तपासल्यानंतरच फलाटावर प्रवेश मिळेल. पहिल्या टप्प्यात प्रयागराज, मिर्झापूर, कानपूर, अलिगड येथे हा नियम लागू होईल. रेल्वेच्या बोगीनुसार वजनाची मर्यादा ठरवण्यात आली आहे. जनरल कोचमध्ये ३५ किलो, स्लीपर कोचमध्ये ४० किलो, एसी थ्री टीयरमध्ये ४० किलो, एसी टू टीयरमध्ये ५० किलो, एसी फर्स्ट टीयरमध्ये ७० किलो वजनाचे सामान प्रवाशांना नेता येईल. हा नियम याआधीही निश्चित केला होता. परंतु आता त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. बॅगचा आकारही निश्चित केला जाणार आहे.

# न्या.पांचोलींची शिफारस सर्वसहमतीने झाली नाही

■ नवी दिल्ली

**न्या. नागरत्न यांचा विरोध**

**सर्वोच्च** न्यायालयात न्यायमूर्तीपदासाठी नियुक्ती करण्यासाठी न्यायवृंदाने (कॉलेजियम) नुकतीच राज्यांच्या उच्च न्यायालयांमधील काही न्यायमूर्तींच्या नावांची शिफारस केली. ही शिफारस शक्यतो सर्वसहमती व्हावी अशी अपेक्षा असते. मात्र न्यायमूर्ती विपुल मनुभाई पांचोली यांच्याबाबत अपवाद घडला आहे. न्यायमूर्ती पांचोली यांची शिफारस सर्वसहमतीने झालेली नाही. त्यांच्या नावाला पाच सदस्यीय न्यायवृंदातील एक सदस्य न्यायमूर्ती बी व्ही नागरत्न यांचा विरोध होता, अशी माहिती आता पुढे आली आहे. न्या. पांचोली हे पाटणा उच्च न्यायालयाचे विद्यमान मुख्य न्यायमूर्ती आहेत. मात्र त्यांची पाटणामध्ये बदली होण्यापूर्वी ते गुजरात उच्च न्यायालयात होते. तसेच उच्च न्यायालयाच्या सेवाज्येष्ठतेच्या यादीत त्यांचा ५७ वा क्रमांक लागतो. त्यामुळे न्या. नागरत्न यांनी सेवाज्येष्ठता आणि प्रादेशिक प्रातिनिधित्व या मुद्द्यांवर न्या. पांचोली यांची शिफारस करण्यास विरोध दर्शविला होता, अशी चर्चा काही प्रसिद्धी माध्यमांमध्ये आता ऐकू येत आहे.

न्या. नागरत्न यांच्या आक्षेपानुसार सर्वोच्च न्यायालयात गुजरात उच्च न्यायालयाचे आधीच दोन न्यायाधीश आहेत. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. एन. व्ही. अंजारिया हे गुजरात उच्च न्यायालयातून आलेले आहेत. न्या. पांचोली यांची निवड झाल्यास गुजरात उच्च न्यायालयातून येणारे ते तिसरे न्यायाधीश ठरतील. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे न्या. पांचोली यांना सर्वोच्च न्यायालयात स्थान मिळाल्यास त्यांना २०३१ मध्ये सरन्यायाधीशपदाची संधी मिळू शकते. न्या. पांचोली यांची गुजरातमधून बिहारमध्ये करण्यात आलेली बदली, यावरही प्रश्नचिन्ह लागू शकते. त्यामुळे एक चुकीचा पायंडा पाडला जाऊ शकतो.

# मराठवाड्यात पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत! अनेक गावांचा संपर्क तुटला

■ नांदेड

**मराठवाड्यात** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पावसाने पुन्हा कहर केला. यामध्ये नांदेड, लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला. अनेक रस्ते पाण्याखाली गेले. शेतांमध्ये पाणी शिरल्याने शेतीचेही प्रचंड नुकसान झाले. प्रशासन दक्ष असून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सुरू आहे.

नांदेड जिल्ह्यात काल सायंकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे मुखेड, कंधार व नायगाव तालुक्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. मुखेड तालुक्यातील चांडोळा, येवती, जांब, बाऱ्हाळी, मुक्रमाबाद, अंबुलगा आणि जाहुर यांसह आठ गावांना पावसाचा जबरदस्त फटका बसला. हसनाळ व रावणगाव ही बुडीत क्षेत्रातील गावे पुन्हा पाण्याखाली गेली. कंधार तालुक्यातील हाळदा, भूकमारी, चौकी महाकाय, लाडका, गोणार, देवईचीवाडी, गुंडा, जाकापूर, चिखली अशा २० गावांमध्ये पुराचे पाणी शिरले. लाडका, मानसिंगवाडी, रुई व मोहिदा परांडा या गावांचा संपर्क तुटला. उर्ध्व मन्यार प्रकल्प धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे त्यातील अतिरिक्त पाणी सोडले. सध्या ७ दरवाजे उघडले आहेत.

# तिन्ही गॅझेटमध्ये समाजाच्या नोंदी नाहीत! जरांगेंची मागणी निरर्थक

**विखे-पाटील यांचे वक्तव्य**

■ मुंबई

**हैदराबाद** गॅझेट, मुंबई गॅझेट आणि सातारा गॅझेट या तिन्ही गॅझेटमध्ये कोणत्याही समाजाच्या वैयक्तिक नोंदी नाहीत. तर या तिन्ही गॅझेटमध्ये समाजातील विविध जातींची तत्कालीन लोकसंख्येची आकडेवारी आहे. त्यामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांची मागणी निरर्थक असल्याचे मंत्री आणि मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

विखे-पाटील म्हणाले की, वैयक्तिक माहिती नसताना निव्वळ गॅझेटमधील आकडेवारीवरून सरसकट आरक्षण देता येणार नसल्याचा निष्कर्ष मराठा आरक्षणासाठी स्थापन केलेल्या माजी न्या. संदीप शिंदे समितीने काढला आहे. त्यामुळे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये हे तिन्ही गॅझेट लागू करण्याची अट निरर्थक आहे. या तिन्ही गॅझेटचा अभ्यास सुरू आहे. या तिन्ही गॅझेटमध्ये मराठा-कुणबी समाजाच्या वैयक्तिक नोंदी नसताना हे गॅझेट तेलगू कसे करता येईल याविषयी चर्चा करायला शिंदे समिती नुकतीच छत्रपती संभाजीनगरला गेली होती. या समितीने जरांगे यांच्यासोबत गॅझेटविषयी चर्चा करण्यासाठी वेळदेखील मागितली. मात्र ते समितीला भेटले नाहीत. समितीने हैदराबाद गॅझेटचा अभ्यास करण्यासाठी तेलंगणचा दौरा केला होता. ते पुढे म्हणाले, तेलंगणा सरकारनेही कागदपत्रे स्कॅन करून समितीला दिली. मात्र हैदराबाद गॅझेट आणि या कागदपत्रांमध्येही वैयक्तिक माहिती आढळली नाही. शिंदे समितीला मुदतवाढ देवून हैदराबाद गॅझेट संदर्भातील अहवाल तातडीने सादर व्हावा, असाच सरकारचा प्रयत्न आहे. ही प्रक्रिया थोडीशी गुंतागुंतीची आहे. यामुळे कोणावरही अन्याय व्हायला नको.

# बिहारमध्ये हायअलर्ट जारी नेपाळमार्गे ३ दहशतवादी घुसले

■ पाटणा

**पाकिस्तानी** दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचे ३ दहशतवादी नेपाळमार्गे बिहारमध्ये घुसले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मतदार हक्क यात्रा सध्या मोतिराहीमध्ये आहे. मोतिहारीमार्गेच हे दहशतवादी बिहारमध्ये शिरले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस मुख्यालयाने सर्व जिल्ह्यांसाठी हायअलर्ट जारी केला आहे.

मोहम्मद उस्मान, आदिल हुसैन आणि हसनैन अली अवान अशी या संशयित दहशतवाद्यांची नावे आहेत. मोहम्मद बहावलपूर, आदिल उमरकोट आणि हसनैन हा रावलपिंडीचा आहे. त्यांच्या नावांसोबत त्यांचे फोटो देखील पोलीस मुख्यालयाने जारी केले आहेत. या तिघांच्या पासपोर्टची माहितीही उघड झाली असून, ते ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच काठमांडूला पोहोचले होते. तेथून ते बिहारमध्ये घुसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे बिहारमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून पोलीस मुख्यालयाने हायअलर्ट जारी केला आहे. हे दहशतवादी हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

# राज ठाकरेंच्या घराबाहेर शॉर्टसर्किटमुळे कारला आग

■ मुंबई

**महाराष्ट्र** नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानाबाहेर एका इनोव्हा कारने अचानक पेट घेतला. या घटनेने परिसरात एकच गोंधळ उडाला. सध्या गणेशोत्सव सुरू असल्याने राज ठाकरे यांच्या घरीदेखील बाप्पाचे आगमन झाले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळातील नेते, पदाधिकारी आणि नागरिक दर्शनासाठी मोठ्या संख्येने येत असतात. त्यात ही घटना घडल्याने काही काळ तणावाचे वातावरण होते. शॉर्टसर्किटमुळे कारला आग लागली. विशेष म्हणजे, आग लागली तेव्हा गाडीत चालकही होता. मात्र सुदैवाने त्याला वेळेत बाहेर काढण्यात आले असून, कुठलीही जीवितहानी झाली नाही. ही घटना शिवतीर्थच्या अगदी समोरच घडल्याने पोलीस व अग्निशमन दलाची मोठी धावपळ झाली. आग तत्काळ विझवण्यात आली.

